



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १७५ * नांदेड * गुरुवार, दि. २ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# नांदेडसह मराठवाड्याला येलो तर विदर्भाला ऑरेंज अलर्ट



**मुंबई (प्रतिनिधी)**– हवामान विभागाने विदर्भ आणि मराठवाड्यासाठी येलो तर विदर्भातील काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, अकोला आणि बुलडाणा या ५ जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड, हिंगोली जिल्ह्यातही पावसाची शक्यता आहे.

राज्यात मान्सून सक्रिय असून २ जुलै रोजीही अनेक भागांत मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. विशेषतः कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भात पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता असून काही ठिकाणी अतिवृष्टीचा इशाराही देण्यात आला आहे. राज्यात एकूण २ ठिकाणी रेड अलर्ट, १२ ठिकाणी ऑरेंज अलर्ट आणि १९ जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## मुंबईत पावसाचा हाहाकार; कुठे झाडं पडली, तर कुठे रस्ते पाण्याखाली!

महाराष्ट्रात मान्सून चांगलाच सक्रिय झाला असून गेल्या २४ तासांत मुंबईसह उपनगरे, ठाणे, नवी मुंबई आणि कोकणात पावसाने अक्षरशः हाहाकार उडाला. मुसळधार पावसामुळे मुंबई आणि उपनगरांतील रस्ते वाहतूक आणि लोकल सेवेवर मोठा परिणाम झाला असून सखल भागात २ ते ३ फुटांपर्यंत पाणी साचले आहे. अनेक ठिकाणी शाळा आणि इमारतींमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी केला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. मुंबईत बुधवारी सकाळपासूनच पावसाचा जोर कायम असून दादर, माटुंगा, सायन, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडूप आणि मुलुंड परिसरात पावसाची तुफान बॅटिंग सुरू आहे. अंधेरी सबवेमध्ये सुमारे अडीच फुटांपर्यंत पाणी साचल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक बनला. वीरा देसाई रोडही पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. गोरेगावच्या फिल्म सिटी रोड आणि संतोषनगर परिसरातील मुख्य रस्त्यांवर २ ते ३ फुटांपर्यंत पाणी साचल्याने वाहनचालकांची मोठी कोंडी झाली. पश्चिम द्रुतगती महामार्गावर जोगेश्वरीजवळ एसआरपीएफ कॅम्पसमोर २ ते ३ फूट पाणी साचल्याने महामार्गावरील वेग मंदावला. वरळी भागात आणि चेंबूरमध्ये अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचले.

## विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर बिनविरोध

**मुंबई (प्रतिनिधी)**– शिवसेना ठाकरे गटाला धक्का देत आमदार सचिन अहिर यांनी शिंदेंच्या शिवसेनेकडून विधानपरिषद उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर, मंगळवारी त्यांची उपसभापतीपदी निवड झाली आहे.

उपसभापतीपदी सचिन अहिर यांची एकमताने निवड झाली आहे. विरोधी पक्षाचे देखील आभार मानतो त्यांनी देखील सभागृहाचा मान राखून प्रस्ताव मागे घेतला. १९९९ साली मी आणि सचिन अहिर सोबत निवडून आलो होतो. अहिर ह्या शब्दाचा अर्थ गोपालक आणि निर्भीड असा आहे. मला त्यांच्याबाबत अनुभव आहे, ते निर्भीडपणे काम करणारे व्यक्ती आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सचिन अहिर यांचे कौतुक करत अहिर शब्दाचा अर्थ देखील सांगितला. उपासभापतीपदाच्या खुर्चीवर बसल्यावर प्रत्येकाला न्याय द्यायचा असतो, असेही त्यांनी सांगितले.

## श्रीकांत शिंदे आणि ओमराजे निंबाळकर यांच्या केंद्रीय मंत्रिपदाची जोरदार चर्चा

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्ली गाठण्याची शक्यता

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– दुसऱ्यांदा ठाकरेंच्या शिवसेनेला खिंडार पाडून सहा खासदार फोडल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं दिल्लीमध्ये वजन वाढलं आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ फेरविस्तारामध्ये शिवसेना शिंदे गटाला कॅबिनेट मंत्रीपदासह आणखी एक मंत्रीपद मिळेल अशी चर्चा रंगली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांचा दिल्ली दौरा होणार असल्याची चर्चा आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारासंदर्भात यांचा हा दिल्ली दौरा असल्याचं बोललं जात आहे. खासदार श्रीकांत शिंदे आणि ओमराजे निंबाळकर यांनी हे केंद्रीय मंत्रीपदाची शपथ घेणार असल्याची चर्चा सुद्धा जोरात रंगली आहे. या सर्व पार्श्वभूमीवरच हा शिंदे यांचा दौरा होत असल्याची सूत्रांनी माहिती दिली आहे. मंत्रिमंडळातील फेरबदल होण्याची शक्यता असून यामध्ये देशातील राष्ट्रीय प्रवेश परीक्षांच्या कथित पेपर लीक वादामुळे धर्मेंद्र प्रधान यांच्यावर प्रचंड राजकीय दबाव आहे. त्यामुळे या फेरबदलात त्यांची मंत्रिमंडळातून सुट्टी होऊ शकते, असे मानले जात आहे. हरदीप सिंह पुरी यांनाही मंत्रिमंडळातून वगळले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पक्ष संघटना किंवा अन्य जबाबदारीसाठी त्यांच्या नावाचा विचार केला जाऊ शकतो. याशिवाय, ज्या मंत्र्यांची कामगिरी समाधानकारक राहिलेली नाही किंवा ज्या राज्यांमध्ये आगामी काळात निवडणुका आहेत, तिथले समीकरण साधण्यासाठी काही कनिष्ठ मंत्र्यांनाही डच्चू दिला जाण्याची शक्यता आहे.

तसेच रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर आणि पंतप्रधानांचे माजी प्रधान सचिव शक्तिकांत दास यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा आहे. त्यांना थेट मंत्रिमंडळात आणून अत्यंत महत्त्वाची जबाबदारी दिली जाऊ शकते. यासह महाराष्ट्रातून महायुतीचे समीकरण मजबूत करण्यासाठी आणि शिंदे गटाला योग्य प्रतिनिधित्व देण्यासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांची केंद्रीय मंत्रिमंडळात एन्ट्री होण्याची दाट शक्यता आहे. 'रामायण' फेम आणि मेरठचे नवनिर्वाचित खासदार अरुण गोविल यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही सध्याच्या मंत्र्यांनी आपल्या कामाची चमक दाखवली आहे, तसेच पक्षाच्या अंतर्गत गणितात त्यांचे स्थान मजबूत झाले आहे, अशा नेत्यांना प्रमोशन मिळू शकते.

सध्याच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे सध्या मोठी जबाबदारी आहे, मात्र सूत्रांच्या हवाल्याने आलेल्या माहितीनुसार, आरबीआयचे माजी गव्हर्नर शक्तिकांत दास देशाचे नवे अर्थमंत्री बनू शकतात. धर्मेंद्र प्रधान यांच्या संभाव्य एक्झिटनंतर, शिक्षण खात्याची धुरा निर्मला सीतारामन यांच्याकडे सोपवली जाऊ शकते, अशीही दिल्लीच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे.

## नांदेड–लातूर रेल्वे प्रश्न मार्गी लागण्याचे संकेत

### रेल्वे मंत्रालयाचे खा. अशोकराव चव्हाण यांना पत्र



**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड आणि लातूर या दोन प्रमुख शहरांना जोडणाऱ्या नवीन थेट रेल्वेमार्गाच्या निर्मितीला गती मिळाली असून या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंह यांनी माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांना पत्र पाठवून ही महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे.

खा. अशोकराव चव्हाण यांनी ९ मार्च २०२६ रोजी राज्यसभेत नांदेड ते लातूर थेट नवीन रेल्वेमार्गाचा मुद्दा उपस्थित करून या महत्त्वपूर्ण मागणीकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले होते. त्याअनुषंगाने रेल्वे आणि अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री रवनीत सिंह खा. चव्हाण यांना पत्राद्वारे या प्रकल्पाची सद्यस्थिती कळवली आहे.

या पत्रात नमूद केल्यानुसार, नांदेड आणि लातूर रोड या दोन्ही शहरांदरम्यान थेट आणि पर्यायी रेल्वे संपर्क उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १०४ किलोमीटर लांबीच्या नांदेड–लातूर रोड नवीन रेल्वे लाईनच्या सर्वेक्षणाला रेल्वे बोर्डाकडून मंजुरी देण्यात आली होती. सद्यस्थितीत या प्रकल्पाचे क्षेत्रीय सर्वेक्षण पूर्ण झाले असून, सध्या सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या महत्त्वपूर्ण घडामोडींमुळे मराठवाड्यातील या दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांदरम्यान थेट रेल्वेसेवा लवकरच मार्गी लागण्याचे संकेत मिळू लागले आहेत.

## अरुणाचल प्रदेशात ढगफुटी आणि भूस्खलन; १४ गावांतील ३१०० हून अधिक नागरिक बाधित



**इटानगर (प्रतिनिधी)**– अरुणाचल प्रदेशातील लोअर सियांग जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या ढगफुटी आणि भूस्खलनामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीत आतापर्यंत ३ जणांचा मृत्यू झाला असून, तब्बल १४ गावांतील ३,१०० हून अधिक नागरिक प्रभावित झाले आहेत. अचानक आलेल्या पुराचा फटका शेती आणि पशुधनालाही मोठ्या प्रमाणावर बसला असून, अनेक वाहने वाहून गेली आहेत.

पूर आणि भूस्खलनामुळे तबिरिपो साकू, लोगलू, रोहे आणि कोयू यांसारख्या गावांचा बाह्य जगाशी संपर्क पूर्णपणे तुटला आहे. सुमारे ५०० कुटुंबे अडकून पडली असून, गावाला जोडणारा झुलता पूल वाहून गेल्याने मोठी समस्या निर्माण झाली आहे. पाणीपुरवठा यंत्रणा, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक ग्रामस्थांना आपली घरे सोडून शेतातील तात्पुरत्या झोपड्यांमध्ये आश्रय घेण्याची वेळ आली आहे.

जिल्हा प्रशासन, भारतीय सैन्य, भारत–तिबेट सीमा पोलीस, बीआरओ आणि स्थानिक पोलीस प्रशासनाकडून संयुक्तपणे बचावकार्य राबवले जात आहे. अडकलेल्या गावांपर्यंत अन्नधान्य आणि पिण्याचे पाणी पोहोचवण्यासाठी हेलिकॉप्टरची मदत घेतली जात आहे. रस्ते वाहतूक पूर्ववत करणे आणि तात्पुरते पूल उभारणे याला सध्या सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला असून, केंद्र सरकारकडून सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले आहे.

## मुलाच्या 'टिप'वरून मैत्रिणीने लांबविले पावणेदहा लाख

### स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केले चोरट्यास अटक; साडेनऊ लाख रुपये जप्त, एसपी निलाभ रोहन यांची माहिती



**नांदेड (प्रतिनिधी)**– नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या एका धक्कादायक आणि खळबळजनक घरफोडीच्या घटनेचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावला असून, या गुन्ह्यात चक्क तक्रारदाराच्या मुलानेच आपल्या अल्पवयीन मैत्रिणीला घरातील रोख रकमेची टिप दिल्याचे समोर आले आहे. प्लॉट खरेदी करण्यासाठी घरात ठेवलेले तब्बल पावणेदहा लाख रुपये या अल्पवयीन मैत्रिणीने घरात घुसून लंपास केले होते. स्थानिक गुन्हे शाखेने दोघांना ताब्यात घेतले असून ९ लाख ३६ हजार रुपये जप्त केले आहेत.

या प्रकरणी गुन्हा दाखल होताच पोलीस अधीक्षक निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव आणि पोलिस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे यांच्या पथकाने तत्काळ तपासाची चक्रे फिरवली. संशयास्पद हालचाली करणाऱ्या एका तरुणीला ताब्यात घेतले असता, या संपूर्ण घरफोडीचा कट उघडकीस आला. आरोपी शुभम कौठेकर याने आपल्या अल्पवयीन मैत्रिणीला घरातील सर्व सदस्य देवदर्शनासाठी बाहेरगावी जाणार असल्याची पूर्वकल्पना दिली होती. इतकेच नव्हे, तर घरात प्लॉट घेण्यासाठी पावणे दहा लाख रुपयांची रोकड ठेवली असून, घराची मुख्य चावी कुठे लपवून ठेवली जाते, याची इत्यंभूत माहितीही त्याने पुरवली होती. आपल्या मित्राकडून मिळालेल्या या अचूक माहितीच्या आधारे कुटुंब बाहेर जाताच, अल्पवयीन मैत्रिणीने घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातील सर्व रक्कम सहज लंपास केली. दरम्यान, तपास पथकाला चौकशी करत असताना एका तरुणीने तोंडाला रुमाल बांधून संशयास्पद हालचाली केल्याचे सीसीटीव्हीत आणि प्रत्यक्षदर्शींकडून आढळून आले होते. याच संशयावरून तिला ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवताच, तिने शुभमनेच संपूर्ण टिप दिल्याची कबुली दिली.

यासोबतच अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथे ग्रामपंचायत समोर लावलेले ट्रॅक्टर चोरी करणारा चोरटे पोलिसांनी अटक केला आहे. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड यांच्या पथकाने केली.

## स्लिपर बस आणि ट्रकच्या भीषण धडकेत सहा जणांचा जिवंतपणी जळून कोळसा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– राजस्थानच्या दौसा जिल्ह्यात दिल्ली–मुंबई द्रुतगती मार्गावर स्लिपर बस आणि ट्रकच्या धडकेत सहा प्रवाशी जिवंत जळाल्याची घटना बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली. अपघातानंतर दोन्ही वाहनांना आग लागल्याने मोठी जिवितहानी झाली. या अपघातात आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाला आहे. दौसाचे पोलीस अधीक्षक पियुष दीक्षित यांनी सांगितले की, हा अपघात पहाटे अडीचच्या सुमारास कोलवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाला. बस ऋषिकेशहून इंदूरकडे जात होती. मिळालेल्या माहितीनुसार, अपघातात २१ जण जखमी झाले असून त्यांना दौसा जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.


## माजी जि.प. अध्यक्ष श्रीराम पाटील राजूरकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– मुखेड तालुक्यातील राजुरा (बु.) येथील रहिवाशी, नांदेड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष श्रीराम पाटील राजूरकर यांचे एका खासगी रूग्णालयात उपचारादरम्यान बुधवार, दि. १ जुलै रोजी निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते.

त्यांच्या पार्थिवावर राजुरा बु. येथे गुरुवार, दि.२ जुलै रोजी दुपारी १ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

श्रीराम पाटील यांनी स्वकृर्तत्व व संघटन कौशल्याने पोलीस पाटील, सरपंच, पंचायत समितीचे सदस्य ते जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असा पल्ला गाठला. माजी मुख्यमंत्री तथा केंद्रीय गृहमंत्री कै. शंकरराव चव्हाण तसेच माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांचे ते विश्वासू सहकारी होते. त्यासह जिल्ह्यातील प्रमुख राजकारण्यांच्या सोबत राजकीय प्रवाहात येत नांदेड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावर शंकरराव चव्हाण यांच्या सहमतीने सलग ११ वर्षे विराजमान राहून शिक्षण, जलसिंचन, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी केली. राजकीय व सामाजिक क्षेत्रात त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले होते.




## गंभीर गुन्ह्याखाली ३० दिवस कोठडीत राहणाऱ्या मुख्यमंत्री व मंत्र्यांचे पद जाणार

### पावसाळी अधिवेशनात विधेयकावर संसदेत वादळी चर्चेची शक्यता

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– गंभीर गुन्ह्याखाली सलग ३० दिवस कोठडीत असलेल्या मंत्र्यांना पदावरून हटवण्याची तरतूद असलेले १३० वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या येत्या पावसाळी अधिवेशनात मांडले जाण्याची शक्यता आहे. या विधेयकाची छाननी करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीचा अहवाल येत्या १७ जुलै रोजी स्वीकारला जाण्याची शक्यता आहे. गंभीर गुन्ह्यांत अटक होऊन सलग ३० दिवस कोठडीत राहिल्यास थेट पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा इतर मंत्र्यांना पदावरून हटवण्याची तरतूद या विधेयकात आहे.

संसदेचे पावसाळी अधिवेशन येत्या २० जुलैपासून सुरु होत आहे. या अधिवेशनात १३० वे घटनादुरुस्ती विधेयक चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी मांडले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संसदेत विधेयक मांडण्यापूर्वी संसदीय समितीने अहवाल स्वीकारणे ही एक कायदेशीर प्रक्रिया आहे, असे एक्सप्रेसच्या वृत्तात म्हटले आहे. या कायद्याचा राजकीय सूडबुद्धीने गैरवापर होऊ नये, यासाठी यात काही अटी घातल्या जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात हे विधेयक मांडले होते.

## देशातील २३ राजकीय पक्षाचे एसआयआरवरून सरन्यायाधीशांना पत्र

### निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभारावर अत्यंत गंभीर आरोप

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– देशातील २३ विरोधी पक्षांनी देशाच्या सरन्यायाधीशांना एक संयुक्त पत्र लिहून, निवडणूक आयोगाच्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनावर (एसआयआर) आणि निवडणुकीशी संबंधित इतर मुद्द्यांवर चिंता व्यक्त केली आहे.

निवडणूक आयोगावर पक्षपातीपणाचा गंभीर आरोप केला आहे. हे पत्र ८ जून रोजी झालेल्या 'इंडिया' आघाडीतील २५ विरोधी पक्षांच्या बैठकीनंतर काही आठवड्यांतच आले आहे. त्या बैठकीत, पक्षांनी एकता कायम ठेवण्याची शपथ घेतली आणि एसआयआर व निवडणुकांच्या निष्पक्षतेच्या मुद्द्यावर सरन्यायाधीशांना संयुक्त पत्र पाठवण्याचा निर्णय घेतला. यामध्ये द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके), आम आदमी पार्टी (आप) आणि एका अपक्ष खासदारासारख्या 'इंडिया' आघाडीबाहेरील पक्षांचाही समावेश आहे.

या महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या बैठकीला डीएमके आणि आप उपस्थित नसले तरी, आता दोन्ही पक्षांनी या संयुक्त पत्रावर स्वाक्षरी केली आहे. 'इंडिया' आघाडीचा माजी मित्रपक्ष असलेल्या द्रमुकने या महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या बैठकीला हजेरी लावली नाही. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसने द्रमुक सोडून तामिळनाडू वेट्री कळघम (ढतघ) सोबत आघाडी करण्याचा निर्णय घेतल्याचे कारण देण्यात आले. त्या बैठकीत द्रमुकसोबतच्या वागणुकीवरून काँग्रेसला टीकेला सामोरे जावे लागले होते. द्रमुक आणि आप या दोन्ही पक्षांना 'इंडिया' आघाडीत परत आणण्याचा प्रयत्न सर्व पक्ष करतील, यावरही नेत्यांमध्ये एकमत झाले होते.

काँग्रेसचे खासदार आणि पक्षाचे माध्यम प्रभारी सरचिटणीस, जयराम रमेश यांनी सांगितले की, ८ जूनच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सरन्यायाधीशांना संयुक्त पत्र पाठवण्यात आले आहे. ते म्हणाले, ८ जून २०२६ रोजी 'इंडिया' आघाडीच्या बैठकीला २१ राजकीय पक्ष आणि एक अपक्ष खासदार उपस्थित होते. त्या बैठकीत निवडणूक आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेसंदर्भात आणि इतर निवडणूक–संबंधित मुद्द्यांबाबत सरन्यायाधीशांना एक संयुक्त पत्र पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# खून नात्याचा की संस्कारांचा?

केतन अग्रवाल मृत्यूप्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्राला अस्वस्थ केले आहे. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार या प्रकरणात त्याच्या होणाऱ्या वधूचे नाव आरोपी म्हणून समोर आले आहे. या प्रकरणाचा अंतिम निर्णय न्यायालय देईल; मात्र या घटनेने समाजासमोर एक अत्यंत वेदनादायी प्रश्न उभा केला आहे की, आज आपल्या नातेसंबंधांचे नेमके काय होत आहे? एकेकाळी विवाह हा दोन कुटुंबांचे पवित्र बंधन मानले जात होते. प्रेम, विश्वास, त्याग आणि समर्पण या मूल्यांवर नाती उभी राहत होती. आज त्याच नात्यांमध्ये संशय, स्वार्थ, फसवणूक, सूड आणि हिंसेची विषारी बीजे पेरली जात असल्याचे चित्र वारंवार दिसत आहे. प्रेमाच्या नावाखाली निर्माण होणारी नाती काही क्षणांत रक्तरंजित शेवटापर्यंत पोहोचत असतील, तर तो केवळ गुन्हेगारीचा विषय नाही; तो समाजाच्या नैतिक अधःपतनाचा इशारा आहे. अलीकडच्या काळात विवाहबाह्य संबंध, अनेक प्रेमसंबंध, सोशल मीडियावरून निर्माण होणारी आकर्षणे, भावनिक फसवणूक आणि नात्यांतील अस्थिरता यांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. ही समस्या केवळ पुरुषांपुरती किंवा महिलांपुरती मर्यादित नाही. चुकीचा मार्ग स्वीकारणारा कोणताही व्यक्ती समाजासाठी धोकाच ठरतो. त्यामुळे गुन्ह्याचे समर्थन लिंगाच्या आधारावर होऊ नये; त्याचे मूल्यमापन कायदा आणि नैतिकतेच्या कसोटीवरच झाले पाहिजे. सर्वात मोठी चिंता म्हणजे संस्कारांची झपाट्याने होत असलेली पडझड. मुलांना उत्तम शिक्षण, महागडी साधने आणि आर्थिक सुरक्षितता देण्यासाठी पालक धडपडत आहेत; पण प्रामाणिकपणा, संयम, जबाबदारी, नात्यांचा आदर आणि मतभेद संवादातून सोडविण्याची शिकवण देण्यात आपण कमी पडत आहोत. घरात संवाद कमी आणि मोबाईल जास्त झाला आहे. कुटुंब एकत्र राहत असले, तरी भावनिकदृष्ट्या विखुरलेले आहे. समाजातील नैतिक दबावही जवळपास संपुष्टात आला आहे. पूर्वी चुकीच्या वर्तनावर कुटुंब, नातेवाईक आणि समाज प्रश्न विचारत असे. आज माझे आयुष्य, माझा निर्णय या विचाराचा अर्थ अनेकदा सामाजिक जबाबदारी झुगारून देण्यात घेतला जातो. व्यक्तिस्वातंत्र्य महत्त्वाचेच; पण दुसऱ्याच्या जीवनाचा, सन्मानाचा आणि विश्वासाचा बळी घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. विशेषतः तरुण पिढीसमोर नात्यांचे आभासी चित्र उभे केले जात आहे. सोशल मीडियावर दिसणारे आकर्षक जीवन, क्षणिक भावना आणि स्वार्थी अपेक्षा यांनाच अनेकदा प्रेम समजले जाते. नाते टिकविण्यासाठी लागणारा संयम, त्याग, विश्वास आणि संवाद या मूल्यांची जागा तात्कालिक आकर्षणाने घेतली आहे. म्हणूनच मतभेद झाले की संवादाऐवजी सूड, ब्लॅकमेल अर्थात भावनिक शोषण किंवा हिंसेचा मार्ग स्वीकारला जातो. ही प्रवृत्ती समाजासाठी अत्यंत घातक आहे. याहूनही गंभीर बाब म्हणजे अशा घटनांमुळे प्रत्येक मुलगा आणि प्रत्येक मुलगी संशयाच्या भोवऱ्यात अडकू लागते. समाजात परस्पर विश्वास कमी होतो. विवाहसंस्थेबद्दल भीती निर्माण होते. पालक अस्वस्थ होतात. नात्यांवर विश्वास ठेवणे कठीण बनते. एका गुन्ह्याची किंमत संपूर्ण समाजाला अविश्वासाच्या रूपाने चुकवावी लागते. कायद्याने दोषींना शिक्षा करणे आवश्यकच आहे; पण केवळ शिक्षा हा उपाय नाही. घराघरांत मूल्यसंस्कारांची पुनर्स्थापना, शाळा-महाविद्यालयांत जीवनकौशल्यांचे शिक्षण, मानसिक आरोग्याविषयी जागरूकता आणि नातेसंबंधांतील जबाबदारीची जाणीव निर्माण करणे ही काळाची गरज आहे. मतभेद असतील तर नाते तोडता येते; पण एखाद्याचे आयुष्य संपविण्याचा अधिकार कोणालाही नाही. केतन अग्रवाल प्रकरणाचा निकाल न्यायालय देईल. मात्र या घटनेने समाजाला दिलेला संदेश स्पष्ट आहे की, जर आपण कुटुंबातील संस्कार, नैतिक मूल्ये आणि सामाजिक उत्तरदायित्व यांकडे आजही दुर्लक्ष केले, तर उद्या अशा घटना अपवाद राहणार नाहीत. आधुनिकतेचा स्वीकार आवश्यक आहे; परंतु मूल्यांचा त्याग करून नव्हे, अन्यथा आपण केवळ व्यक्ती गमावणार नाही, तर विश्वास, कुटुंब आणि समाज या तिन्हींचा पाया खिळखिळा करू.

# सरकारी नोकरी महत्त्वाची की, उद्योग?




अलीकडील काळात लोकं ओरडत आहेत. ओरडत आहेत की, नीटमध्ये घोटाळा झाला. ज्यातून काही राज्याच्या मुलांना पैकीच्या पैकीच गुण मिळाले. ते सगळं सेटींग होतं आणि ज्यांनी अभ्यास केला. ते मात्र मागं पडले. त्यात लोकांनी आवाज उचलला व नीटच्या त्या परीक्षेवरच आक्षेप घेत ती परीक्षा रद्द झाली. यात जे इमानदारीनं मेहनत करुन पास झाले. त्यांची मेहनत व्यर्थ गेली. तसेच ते द्वितीय प्रयत्नात पास होतीलच, याची शाश्वती नाही. हाच शिक्षणात होत असलेला खेळखंडोबा लक्षात घेवून, शिक्षण घेवून नोकरी मिळवू नये तर एखादा उद्योग उभारावा, असं म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

नीट, एनडीए, जेईई, एमएससी, आयटी आणि इतर तत्सम स्पर्धा परीक्षा. त्या कशासाठी? तर त्या दिल्यानं सरकारी नोकरी लागते व ज्याला सरकारी नोकरी लागली, तो राजा बनतो किंवा त्याचं संपूर्ण आयुष्य राजागत सुखात जात असतं. त्यासाठी लोकं कितीतरी महागड्या शिकवण्या लावून देत असतात. कारण अशी प्रथा आहे की, तशा स्वरुपाच्या शिकवण्या लावल्याशिवाय मुलं पासच होत नाहीत वा स्पर्धा परीक्षेत उच्च स्थानावर जात नाहीत.

सरकारी नोकरी. म्हणतात की, सरकारी नोकरी लागली की बस लोकांची चांदी चांदी असते. एकदा का सरकारी नोकरी लागली की व्यक्ती राजाच बनून जातो. त्याला जास्त शहाणपण येतं व तो मन मानेल तसा वागू शकतो.

लोकांचा सरकारी नोकरीवर असलेल्या लोकांबाबत असा समज. शिवाय त्या सरकारी नोकरीवर असलेल्या लोकांना अपार असं सुख असतं हा दुसरा समज. त्याला कोणीच त्रास देत नाही हा तिसरा समज. तसंच त्याला कोणतीही कामं करावी लागत नाहीत हा चवथा समज आणि सर्वात मोठा समज म्हणजे तो कुणाचा गुलाम राहात नाही.

सरकारी नोकरी तशी चांगलीच आहे. जर वरचा अधिकारी चांगल्या स्वभावाचा असला तर. तो अधिकारी समजून घेणारा, सुशील विचारांचा. मृदू भाषी, आपली स्वतःची अक्कल लावणारा. प्रेमानं कोणत्याही गोष्टी समजून सांगणारा त्यातच न रागावणारा असावा. तसाच कोणत्याही गोष्टीचे दडपण न बाळगणारा असावा. त्याचेमध्ये राग, द्वेष लोभ, मोह यासारखे दुर्गुण नसावे. व्यतिरिक्त कोणताच स्वार्थ नसावा त्याचे मनात. तोच व्यक्ती अधिकारपदावर शोभून शकतो. शिवाय असे दुर्गुण असल्यास त्यानं ते तत्काळ आपल्या अंगातून काढून टाकायला हवेत. परंतु आजचे अधिकारी तशा स्वभावाचे नसतात. त्यामुळं त्याच्या अधिनस्थ असलेल्या कर्मचाऱ्यांना अतिशय त्रास होत असतो. शिवाय गुलामागत जीवन काढावं लागतं.

सरकारी नोकरी ही नावालाच सुखी असणारी नोकरी आहे. तिची अवस्था जावे त्याच्या वंशा अशी आहे. त्या ठिकाणी असणाऱ्या व्यक्तीला भयंकर पीडा सहन करावी लागते. शिवाय काही बोलून त्रास व्यक्तही करता येत नाही. काही बोलून मन मोकळे करायचे झाल्यास आणि तसं केल्यास लोकं त्यांची टर उडवतात. म्हणतात की, आम्हाला शिकवू नका. आम्हाला माहीत आहे, सरकारी नोकरी करणारे कसे असतात ते. त्यांच्यापैकी काही ऑफिसमध्ये खुर्च्या तोडत बसलेले असतात. त्यांचा दिवस रात्रीला उगवतो. ते रात्रीच बसतात कामं करायला. दिवसभर बरेचसे हिंडत असतात. कोणीच जागेवर सापडत नाहीत. परंतु हे जरी खरं असलं तरी कोणतंही काम करतांना मन लावून काम करावं लागतं. नाहीतर आकडे चुकतात. म्हणूनच रात्रीला कामं चालतात. कारण रात्री येणाऱ्या जाणाऱ्यांची गर्दी कमी असते व काम करण्यात व्यत्यय वा अडथडा येत नाही. म्हणूनच रात्रीला कामं. कधीकधी घरीही फायली आणून रात्रीचा दिवस एक करुन कामं केली जातात. कधीकधी अशी कामं केल्यानं डोकं दुखतं. हे डोकं सतत दुखत असल्यानं डोकेदुखीचा त्रास उद्भवतो. त्यातच बरेचसे सरकारी कर्मचारी हे दुर्धर आजाराचे शिकार ठरतात. दुसरं आजाराचं कारण म्हणजे सतत काम करीत असल्यानं जे काही त्याच्यातील षडरिपू अंतर्मनातून बाहेर पडतात. त्यातूनही आजार उत्पन्न होवू शकतात. शिवाय तसेच काही आजार हे वरीष्ठ अधिकारीवर्ग त्यांना देत असलेल्या त्रासातून वा गुलामागत वागणूक देण्यातून उद्भवत असतात.

सरकारी नोकरी....सर्व लोकं आजच्या काळात सरकारी नोकरी मिळावी म्हणून उच्च शिक्षण घेत असतात. त्यांना वाटत असते की सरकारी नोकरी लागावी. त्यासाठी ते स्पर्धा परीक्षाही देत असतात आणि त्या परीक्षेत चांगल्या गुणांकानं पास व्हावं व मी झालो पाहिजे, यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असतात नव्हे तर परीक्षा देत असतात. त्यातच ती परीक्षा झाली व ते स्पर्धक चांगल्या गुणानं पास झाले की बस. नोकरी लागत असते व नोकरी कोणती असते तर ती सरकारी.

ती सरकारी नोकरी. ती सरकारी नोकरी जर राजागत असली तर संपूर्ण आयुष्य अगदी सुखात जातं. जर त्या,त्या कर्मचाऱ्यांचा तो तो अधिकारी चांगला असला तर...तो जर चांगला नसेल तर त्या कर्मचाऱ्यांला गुलामागत आयुष्य काढावंच लागत नाही. परंतु अशा प्रकारचे अधिकारीही नसतात आणि आजच्या काळातील सरकारी नोकरी ही राजागत सुखमयही नसते. कारण जे अधिकारी त्यांच्या कर्मचाऱ्यांना त्रास देत असतात. त्या अधिकाऱ्यांनाही त्रास देणारे त्यांच्या वरचे उच्चपदस्थ मंडळी असतात. जे शिकलेले तर नसतात. परंतु केवळ पैशाच्या भरवशावर त्या अधिकाऱ्यांवर दबाव आणत असतात. त्यामुळंच त्यांना गुलामागत कार्य करावं लागतं. ती त्रास देणारी मंडळी असतात, ज्यांना आमदार, खासदार म्हणतात. तसंच अशा आमदार, खासदारांवर उद्योगपतींचा दबाव असतो. कारण तीच मंडळी असे आमदार, खासदार निवडून यावेत. म्हणून पैसा लावत असतात.

सरकारी नोकरी ही अतिशय मेहनतीनंतर मिळत असते. ती कोणालाही मिळत नाही. त्यासाठी स्पर्धा परीक्षा आणि इतर बरेच वशिले लागतात. त्यातच ती मिळाली तरी वागणूक मात्र गुलामागत. त्यापेक्षा एखादा लहानसा उद्योग करणारा बरा की जो न शिकूनही सरकारी कर्मचाऱ्याएवढेच वेतन कमवतोय. परंतु कोणाची ठसन ऐकत नाही. अशा व्यक्तीला कोणी वेडे-वाकडे बोलल्यास त्यांना वेळप्रसंगी त्यांची जागाही दाखवून देत असतो. एवढी ताकद त्यांच्यात असते. तो व्यक्ती शिकलेला नसला तरी स्वतंत्र असतो आणि सरकारी नोकरीवर असलेला व्यक्ती उच्च शिक्षित असला आणि गुलाम जरी नसला तरी त्याला गुलामागत वागावं लागतं. नाहीतर नोकरीवरुन हात धुवावं लागतं. यातून असं दिसतं की एखादा लहानसा उद्योग बरा. कारण त्या उद्योगात तेवढा पैसा लागत नसते. फक्त थोडासा अनुभव हवा असतो. तो अनुभव कालांतरानं मिळतोच. त्यासाठी जास्तची मेहनतही करावी लागत नाही. अर्थात स्पर्धा परीक्षा द्याव्या लागत नाहीत. शिवाय स्पर्धा परीक्षा पास होण्यासाठी खाजगी शिकवण्या लावण्यासाठी जास्तचा पैसा खर्च करावा लागत नाही. शिक्षणालाही तेवढा खर्च होत नाही.

विशेष सांगायचं झाल्यास आजच्या काळातील लोकांनी जास्त शिक्षण घेतलं नाही तरी चालेल. कारण आजच्या काळात जास्तीचं शिक्षण हे आदर्श गुलाम निर्माण करणारं शिक्षण आहे. असं जास्तीचं शिक्षण घेण्याऐवजी लोकांनी एखाद्या उद्योगाचं शिक्षण घ्यावं. एखादा लहानसा उद्योग उभारावा. तो वाढवत वाढवत न्यावा व त्याच उद्योगात देशातील तंत्रज्ञ वा उच्चशिक्षित लोकं नोकरीवर नियुक्त करावेत. तसेच त्यांनी समाजात आदर्श निर्माण करावा की शिक्षण हे नोकरी करण्यासाठी शिकू नये तर स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी शिकावे. तसंच स्वतः आत्मनिर्भर व्हावे कारण शिक्षण हे गुलामी करण्यासाठी नाही तर ते सुधारण्यासाठी आहे. आपली अवस्था बदलविण्यासाठी आहे. विशेष महत्वपुर्ण बाब ही की शिक्षणातून माणूस बनतो. पशू नाही. यासाठीच शिक्षण घेवून उद्योग उभारणे महत्वाचे व्यतिरिक्त शिक्षण घेवून सरकारी नोकरी मिळविणे महत्वाचे नाही. ज्यातून देशाची प्रगती होवू शकेल. देश सुजलाम सुफलाम होवू शकेल व देशाला महासत्ताही बनवता येवू शकेल. हे तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : बळीराजाच्या स्वाभिमानाला नवे बळ!

महाराष्ट्र ही संतांची, पुरोगामी विचारांची आणि अहोरात्र कष्ट करणाऱ्या बळीराजाची भूमी आहे. राज्याची अर्थव्यवस्था, ग्रामीण विकास आणि सामाजिक जीवनाची वीण ही शेती व शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांवर उभी आहे. निसर्गाची अनिश्चितता, अवकाळी पाऊस, दुष्काळ, बाजारभावातील चढ-उतार आणि वाढता उत्पादन खर्च अशा असंख्य संकटांचा सामना करत अन्नदाता आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहतो. अशा या शेतकऱ्याला केवळ सहानुभूतीची नव्हे, तर आर्थिक स्थैर्य, विश्वास आणि शासनाच्या भक्कम पाठबळाची आवश्यकता असते.

याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' जाहीर केली आहे. ही योजना केवळ कर्जमाफीची घोषणा नसून, शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाला बळ देणारे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी गती देणारे आणि शेती क्षेत्रात नवचैतन्य निर्माण करणारे एक ऐतिहासिक पाऊल आहे.

महाराष्ट्रात दरवर्षी १ जुलै हा दिवस 'कृषी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. आधुनिक शेती, सिंचन, पीकपद्धतीतील बदल आणि कृषी विकासाच्या दूरदृष्टीपूर्ण धोरणांमुळे त्यांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबनाच्या दिशेने नेले. 'शेतकरी समृद्ध झाला तरच राज्य समृद्ध होईल,' हा त्यांचा दूरदर्शी विचार आजही तितकाच प्रेरणादायी आहे.

स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या याच विचारांचा वारसा पुढे नेत महाराष्ट्र शासनाने जून २०२६ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जाची माफी जाहीर करण्यात आली आहे. त्याचबरोबर, प्रतिकूल परिस्थितीतही प्रामाणिकपणे कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शिस्तीचा आणि प्रामाणिकपणाचा सन्मान करत त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. त्यामुळे ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित न राहता, आर्थिक शिस्तीलाही प्रोत्साहन देणारी ठरते.

राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध आहे. राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेअंतर्गत ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

याशिवाय, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या आणि ज्यांची खाती बँकांकडे अनुत्पादित मालमत्ता (एनपीए) म्हणून वर्गीकृत झाली आहेत, अशा शेतकऱ्यांसाठीही शासनाने दिलासादायक भूमिका घेतली आहे. बँकांसोबत 'एकवेळ समझोता' (One Time Settlement OTS) करण्याच्या माध्यमातून या शेतकऱ्यांना नव्याने आर्थिक प्रवाहात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या योजनेत करण्यात आला आहे. त्यामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभारी मिळण्याचा मार्ग खुला होणार आहे.

कोणतीही योजना केवळ घोषणांपुरती मर्यादित न राहता तिचा लाभ शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पारदर्शक, वेगवान आणि प्रभावीपणे पोहोचला पाहिजे, या भूमिकेतून शासनाने अंमलबजावणीची मजबूत यंत्रणा उभारली आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी थेट मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हानिहाय आवश्यक निधीची तातडीने उपलब्धता करून देण्यात आली असून, महाआयटीच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया डिजिटल, पारदर्शक आणि वेळबद्ध करण्यात आली आहे. शासनाच्या कार्यपद्धतीतील ही गतिमानता आणि उत्तरदायित्व या योजनेच्या यशाला अधिक बळकटी देणारे ठरणार आहे.

ही कर्जमुक्ती योजना म्हणजे केवळ आर्थिक मदतीचा कार्यक्रम नाही; तर बळीराजाच्या आत्मविश्वासाला नवसंजीवनी देणारा, त्याच्या स्वाभिमानाचा सन्मान करणारा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नव्या उमेदीने पुढे नेणारा परिवर्तनाचा संकल्प आहे. कृषी दिनाच्या पावन निमित्ताने शेतकऱ्यांच्या हितासाठी उचललेले हे ऐतिहासिक पाऊल महत्वाचे ठरणार आहे. या योजनेच्या बळावर महाराष्ट्रातील बळीराजा नव्या आत्मविश्वासाने उभारी घेईल, शेती अधिक सक्षम बनेल आणि ग्रामीण समृद्धीचा नवा अध्याय लिहिला जाईल.

**-वर्षा फडके-आंधळे**
उपसंचालक (वृत्त)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# अति तिथं माती

'अति तिथं माती' ही म्हण जगातल्या प्रत्येक माणसाला माहीत आहे. कोणतीही बाब योग्य प्रमाणातच असली पाहिजे. अगदी अत्यंत चांगल्या गोष्टीने सुद्धा प्रमाण ओलांडले तर ती गोष्ट चांगली राहत नाही. आणि एखादी वाईट वाटणारी गोष्ट सुद्धा प्रमाणात असेल तर ती वाईट ठरत नाही. म्हणूनच जगात अशा अनेक बाबी आहेत ज्यांना विष मानले आहे तरीसुद्धा त्या जीवनात प्रमाणामध्ये असाव्या लागतात. उदाहरणच द्यायचे झाले तर नित्याच्या जेवणामध्ये असणाऱ्या मिठाला आणि साखरेला संशोधनानुसार विषच मानावे लागेल. पण तरीसुद्धा यांचे जेवणात आणि जीवनात किती महत्त्वाचे स्थान आहे हे आपण सर्वजण जाणतोच. मिठाशिवाय जेवणाला चवच नाही. या उलट अनेक वस्तू अमृतासारख्या आहेत. तरीसुद्धा त्या प्रमाणाबाहेर सेवन केल्या तर त्या विषच ठरतात. ही गोष्ट केवळ खाण्याच्या बाबी संदर्भातच नाही. तर ती जीवनातील प्रत्येक बाबीला लागू पडते. म्हणून आम्ही नेहमी ऐकत आलोय 'प्रमाणामध्ये सर्व काही असावे...' या वरील एक सुंदर कविता मला आठवते.

अति कोपता कार्य जाते लयाला
अति नम्रता पात्र होते भयाला
अति काम ते कोणतेही नसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...
अति भूषणे मार्ग तो संकटाचा
अति थाट तो वेश होतो नटाचा
राहावे असे की न कोणी हसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...
स्तुतीला अति बोलती ती श्वानवृत्ती
अति लोक निंदा करी दुष्ट चित्ती
न कोणा उगे शब्द स्पर्शे डसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...
जुन्या चे अति भक्त ते हटवादी
नव्याचे अति लाडके ते शुद्ध नादी
खरे सार शोधुनिया नित्य घ्यावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...

ही कविता वाचल्यावर स्पष्टपणे समजते की कुठलीही गोष्ट प्रमाणापेक्षा जास्त झाल्यास ती वाईट असते. मुळात ज्या गोष्टी वाईट आहेत त्या अजिबातच नसाव्यात. पण चांगल्या गोष्टींचा सुद्धा अतिरेक होऊ नये. उदाहरणच द्यायचे झाले तर... इतरांना मदत करणे, वेळोवेळी सहकार्य करणे ही चांगली बाब आहे. पण ती सुद्धा योग्य मर्यादेत असली पाहिजे. स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी सक्षम नसणाऱ्या माणसांनी सतत परोपकाराच्या नावाखाली... आणि माणुसकीच्या लेबलाखाली सतत काही व्यक्तींना मोठ्या प्रमाणात आणि आवाक्याबाहेर केलेली मदत कायमस्वरूपी प्रश्नच निर्माण करते. सतत स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या गरजा भागवण्यापेक्षा...स्वतःचे आणि कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्यापेक्षा...तुम्ही जर काही विशिष्ट माणसांना आवाक्याबाहेरची मदत करत असाल तर हे व्यावहारिक जग तुम्ही कोणीही असाल तरीसुद्धा तुम्हाला नक्की प्रश्न विचारेल. असे का...? आणि असे करण्यामागचा नेमका हेतू काय...? हे सर्वांनाच ज्ञात आहे. तरीसुद्धा माणसे आयुष्यभर प्रमाण सांभाळत नाहीत. अक्षरशः वाहवत जातात. परोपकार आणि चांगुलपणा याचा अतिरेक करतात...

तार्किक विचार केला तर तुम्ही जर एखाद्या व्यक्तीशी अति प्रमाणात चांगले..... अतीव सहकार्याचे...वागत असाल तर बघणाऱ्यांना याच्याही पुढे जाऊन प्रत्यक्ष ज्या व्यक्तीशी चांगले वागत आहात अगदी त्यालासुद्धा नक्कीच प्रश्न पडतो. असे का...? मुळात तुम्ही कितीही चांगले असलात. तरी तुमचा चांगले-वाईटपणा हा तुमच्या मनाच्या निरागसतेवरून ठरत नाही तो ठरतो तुमच्या वागण्यावरून. म्हणून किमान स्वतःसाठी नाही तर जगासाठी तरी प्रमाण सोडायचे नसते. कधीकधी चांगल्या गोष्टी सुद्धा प्रमाणापेक्षा जास्त झाल्या तर त्याचेही व्यसन लागते आणि त्याची सुद्धा नशा यायला लागते. बरीच माणसे परोपकार आणि चांगुलपणाच्या नशेत जगतात... संपूर्ण आयुष्य या नशेमध्ये वाहवत जातात... हे सगळे करताना आपल्या अत्यंत जवळच्या माणसांना दुखावतात... कळत-नकळत त्यांच्यापासून दूर जायला लागतात. एक दिवस बऱ्याच मोठ्या वाईट अनुभवानंतर चांगुलपणाची नशा उतरते, आणि त्यावेळी मात्र काहीच शिल्लक उरलेले नसते.

आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण झाल्यानंतर जमेल तेवढी गरजूंना मदत ही सर्व-सामान्य पद्धत आहे. मुळात आपले आणि आपल्या कुटुंबाचे हित साधन्यापूर्वीच इतरांना आवाक्याबाहेर असणारी मदत करणे सुद्धा एका दृष्टीने आपल्या कुटुंबावर झालेला अन्याय असतो. याच्याही पुढचा विचार म्हणजे प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आपल्याला जमेल तेवढे कष्ट...जमेल तेवढे कार्य... आणि जमेल तेवढेच कर्तृत्व करण्याचा प्रयत्न करावा. काम करण्याचा... कष्ट करण्याचा.... आणि पैसा कमावण्याचा सुद्धा अतिरेक होता कामा नये. अर्थार्जनाचे सुद्धा व्यसन लागता कामा नये.

आपले आणि आपल्या कुटुंबाचे जीवन घडवताना अती धावपळ करणे सुद्धा व्यर्थ आहे. मुळात क्षणभंगुर असणाऱ्या जीवनासाठी अफाट धावपळ करून बिनभरवश्याची गुंतवणूक कशासाठी...? मुळात जीवन तुम्हाला गुंतवणूक मागत नाही. या जीवनाला खऱ्या अर्थाने सोडवणुकीचे गरज असते. गोष्टी समजून साध्या, सोप्या, सरळ करता आल्या पाहिजेत. अत्यंत साधेपणाने आणि मोकळ्या वातावरणात जगता आले पाहिजे. शेवटी रिकाम्या हाताने आलेला माणूस रिकाम्या हातानेच परत जातो. मग आयुष्यभराची ही सगळी ओढाताण कशासाठी....? याचा अर्थ असा नाही की माणसाने कष्ट करू नयेत...काम करू नये... प्रयत्न करू नयेत....याउलट माणसाने सतत क्रियाशील रहावे. यात शंकाच नाही, पण कुठलीही धावपळ आणि कष्ट आपल्या जीवापेक्षा आणि जीवनापेक्षा महत्त्वाचे नाहीत. कोणतेच काम आपल्या जिवापेक्षा मोठे नाही. तुम्ही कितीही उदात्त, समाजहिताचे आणि विश्वकल्याणाचे काम करत असलात तरीसुद्धा ते काम करण्यासाठी तुमचे आरोग्य चांगले राहणे गरजेचे आहे. म्हणून प्रमाणापेक्षा जास्त धावपळ केल्याने आजारी पडाल आणि करत असलेले ध्येयवेडे उदात्त कार्य थांबेल. म्हणून कार्य चालू राहण्यासाठी तरी प्रमाणात धावपळ करा. त्यामुळे थोडक्यात काय तर अति सर्वत्र वर्जयेत म्हणतात ते या अर्थाने.

**-मयूर मधुकरराव जोशी**
'विठ्ठल-रुक्मिणी' नगर, जिंतूर
मो. ७९७२३४४१२८

# नवतंत्रज्ञान व जोड व्यवसायातून शेतीची प्रगती साधा -संदीप माळोदे

## ▸ जिल्हा परिषदेत कृषी दिन उत्साहात साजरा
## ▸ पीक स्पर्धा विजेते शेतकऱ्यांचा सन्मान



**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती अधिक उत्पादनक्षम करावी. तसेच शेतीला पशुपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय यांसारख्या जोड व्यवसायांची जोड देऊन आर्थिक प्रगती साधावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी केले. शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषदेमार्फत विविध कृषी व पूरक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कृषी विभाग, आत्मा, जिल्हा परिषद कृषी विभाग आणि पंचायत समिती, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात कै. वसंतराव नाईक जयंती व कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या पुनम पवार, पोखरणी येथील कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. देविकांत देशमुख, कापूस संशोधन केंद्राचे डॉ. अरविंद पंडागळे, कृषी विज्ञान केंद्र सगरोळीच्या वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. माधुरी रेवणकर, डॉ. शिवाजी शिंदे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले, जिल्हा कृषी विकास अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, उपविभागीय कृषी अधिकारी सुप्रिया वायवळ, आत्माचे उपविभागीय कृषी अधिकारी गुंजकर आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या खेती बचाओ – धरती बचाओ अभियानांतर्गत जिल्हाभर जनजागृती सुरू असून, शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करून सेंद्रिय शेतीचा स्वीकार करावा, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र, पोखरणीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. देविकांत देशमुख यांनी केले. व्यापक जनजागृतीमुळे जिल्ह्यात अद्याप सुमारे ९५ टक्के शेतकऱ्यांनी पेरणी केलेली नसल्याने दुबार पेरणीचे संकट कमी राहण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. कृषी विज्ञान केंद्रात माती व पाणी परीक्षणाची सुविधा उपलब्ध असून अडचणीच्या वेळी शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्राशी संपर्क साधावा, असेही त्यांनी आवाहन केले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शेतकऱ्यांनी घरच्या बियाणांचा वापर करावा. जमिनीतील ओलाव्याचा अंदाज घेऊनच पेरणी करावी. मागील वर्षी शेतकऱ्यांना सुमारे नऊशे कोटी रुपयांच्या पीक विम्याचा लाभ मिळाल्याचेही त्यांनी सांगितले. यावर्षी हळद पिकाचाही पीक विमा योजनेत समावेश करण्यात असून, पीक विमा भरण्याची अंतिम मुदत १४ जुलै असल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांपर्यंत कृषीविषयक माहिती पोहोचविण्यासाठी गावनिहाय व्हॉट्सप गट तयार करण्यात आले असून, या गटांवर उपलब्ध होणाऱ्या माहितीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. पाणी फाउंडेशनच्या फार्मर कप स्पर्धेअंतर्गत जिल्ह्यात ९०० शेतकरी गटांची स्थापना करण्यात आली असून, पुढील काळात प्रत्येक गावात शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

कपाशीचे उत्पादन वाढविण्यासाठी ३ बाय १.५ फूट अंतरावर लागवड करून रोपांची संख्या वाढविण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. जिल्ह्यात सुमारे ५ लाख १०० हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड होत असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी जिल्हा कृषी विकास अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे यांनी जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी योजनांची सविस्तर माहिती दिली. तसेच संभाव्य एल निनोच्या सावटाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी घ्यावयाची खबरदारी, पीक नियोजन आणि पाणी व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करत त्यांनी स्वतः रचलेली जनजागृतीपर कविता सादर केली.

# गोमुत्रापापासून क्रांती करायची आहे -शेखर मुंदडा




**नांदेड (प्रतिनिधी)–** आजच्यापेक्षाही भविष्यात शेती आणि शेतकऱ्यांची अवस्था बिकट होणार आहे. जास्त उत्पन्न काढण्याच्या नादात सर्व विषारी औषधांचा वापर केल्यामुळे आज आबालवृद्धांमध्ये हर्टअटॅक, कॅन्सरसारख्या असाध्य आजाराचे प्रमाण वाढले आहे. ग्रीन रिहोव्हल्युशन आणि व्हाईट रिव्होल्युशनच्या नावाखाली देशी उत्पादने घटत आहेत. त्यामुळे गोबर आणि गोमुत्रापासून क्रांती (ब्राऊन रिव्होल्यूशन) करायची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा (राज्यमंत्री दर्जा) यांनी नांदेड येथे केले.

महाराष्ट्र गोसेवा आयोग आणि पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने दि. २२ जून ते ५ जुलै अशी पुणे येथून सुरवात झालेली राज्यमाता गोमाता संवाद यात्रा नुकतीच नांदेड येथे पोहोचली. टाळमृदंगाच्या गजरात यात्रेचे स्वागत करण्यात आले. यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. नांदेड हा संवादाचा पंधरावा जिल्हा आहे. सभा ऐवजी संवादाचे रूप यात्रेला दिले आहे. व्यासपीठावर शेखर मुंदडा अध्यक्ष महाराष्ट्र गोसेवा आयोग, जगदीश महाराज, पुरननाथ महाराज, स्वामी आनंदबन महाराज, राजेश गिरी महाराज माहूरगड, डॉ. सुनिल सूर्यवंशी, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, उद्धव नेरकर, डॉ. सखाराम खुणे, हभप माधव महाराज केंद्रे, सनतकुमार महाजन, गोशाळा महासंघाचे अध्यक्ष मारोती कंठेवाड आदी उपस्थित होते.

प्रारंभी गोमातेचे पूजन व आरती करून दीपप्रज्वनानंतर गोमातेची प्रतिमा व स्थानिक गोशाळांनी निर्माण केलेली पंचगव्य उत्पादने देऊन मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. गोसेवा आयोगाचे सदस्य डॉ. सुनील सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकातून गत तीन वर्षात गोशावा आयोगाच्या माध्यमाने गोशाळांना मिळालेली मदत व कायद्यात झालेले बदल सांगितले.

यावेळी उपस्थित संत मंडळींना गायीच्या शेणाचा वापर करून तयार केलेली शेणाची घड्याळ देऊन गोसेवा आयोगाच्या वतीने सन्मानित करण्यात आले. पुढे बोलताना मुंदडा म्हणाले, गोशाळा ही शासनाच्या मदतीशिवाय गोशाळा चालवणे खूप कठीण काम आहे. केवळ भावनिक व आध्यात्मिक दृष्टीने गोशाळा न चालवता वैज्ञानिक व व्यावसायिक दृष्टिकोन ठेवला पाहिजे.गोशाळा आत्मनिर्भर झाल्या पाहिजेत, त्यासाठी मूल्यवर्धन ही संकल्पना आकार घेत असून, नांदेड जिल्ह्यातील श्रीकृष्ण गोशाळा पोखरभोसी ता.लोहा, गोरक्षण संस्था मुखेड व जगदीश महाराज गोशाळा खडकुत ता. अर्धापूर या स्थानिक गोशाळांनी दैनंदिन वापरातील अनेक वस्तू निर्माण केल्या आहेत.या वस्तूंचा वापर आपण मोठ्या प्रमाणात करावा तसेच इतरही गोशाळांनी गोमय उत्पादने करावीत म्हणजे गोशाळा आत्मनिर्भर होतील.

यावेळी ओमप्रकाश पोकर्णा, डॉ. सखाराम खुणे, उध्दव नेरकर आदींनी मनोगत व्यक्त केले. डहाळे काका यांनी स्वागतगीत गाऊन उपस्थितांची मने जिंकली तर कु. महावीरा घोरबांड हिने गोमातेवर आधारित कविता सादर केली. मुक्ताई महिला भजनी मंडळ हडको व माऊली भजनी मंडळ शिवनगर नांदेड यांनी उत्तम प्रकारचे भजन सादर केले. उपस्थितांचे आभार डॉ. प्रवीणकुमार घुले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. अरविंद गायकवाड, गोशाळा महासंघाचे अध्यक्ष मारोती कंठेवाड, सचिव प्रल्हाद घोरबांड, माधव पल्लेवाड, मारोती वडजे, रामजीभाई भानुशाली गोरी, भवानभाई पटेल, विनोद मालू, प्रीतम भराडिया, लोकेश सातोरे, राहुल वाघमारे, गजानन मस्के, राम वाघमारे, गणेश बोडके, मातृभूमी सेवा संघाचे कार्यकर्ते व गोशाळा महासंघाचे कार्यकर्ते यांनी परिश्रम केले.

# इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी २०२६ परीक्षेत यश

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** विष्णुपुरी भागातील सहयोग एज्युकेशनल कॅम्पस अंतर्गत असलेल्या 'सहयोग सेवाभावी संस्था' संचलित इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विद्यार्थ्यांसाठी डी. फार्म., बी.फार्म., फार्म.डी. तसेच एम.फार्म.चे सहा विविध स्पेशलायझेशनमध्ये अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षण, अनुभवी प्राध्यापकवर्ग आणि आधुनिक शैक्षणिक सुविधांमुळे महाविद्यालयाने फार्मसी शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयाने उन्हाळी परीक्षा २०२६ मध्ये घवघवीत यशाची परंपरा कायम राखली आहे. नॅकद्वारे ग्रेड प्राप्त असलेल्या या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बी. फार्म. आणि डी. फार्म. परीक्षांमध्ये उत्कृष्ट गुण मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

बी. फार्म. द्वितीय वर्षात वैशाली नगनुरवार हिने ८.६२ गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला. सानिका चव्हाण हिने ८.५० गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर श्वेता मगर हिने तृतीय क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे बी. फार्म. तृतीय वर्षातील यश जांभूळकर ८.२१ याने प्रथम क्रमांक मिळवला. आदित्य मुदिराज याने द्वितीय क्रमांक ८.१४ तर स्नेहल शिंदे हिने ८.११ गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला.

बी. फार्म. अंतिम वर्षात आर्या कुलकर्णी हिने ८.२२ गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. मनिषा गायकवाड ८.१३ आणि सपना पवार यांनी प्रत्येकी ८.१३ गुण प्राप्त केले असून, त्यांनी द्वितीय क्रमांक मिळवला तर गणेश कदम याने ८.०९ गुण प्राप्त केले आहेत. त्यांनी तृतीय क्रमांक पटकावला. डी. फार्म. द्वितीय वर्षात नशराह सय्यद हिने ८१.८०% गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. वैशाली नरवाडे ७९.६०% हिने द्वितीय क्रमांक तर संकर्षण लोंढे (७८.२०%) याने तृतीय क्रमांक मिळवला.

डी. फार्म. तृतीय वर्षात कल्याणी करकडे हिने ८६.५०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. खुशी चंदेल ८१.८०% हिने द्वितीय क्रमांक तर महेश ब्राह्मणकर ८०.६०% याने तृतीय क्रमांक मिळवला. डी. फार्म. चतुर्थ वर्षात खान मुस्कान हिने ८२.६०% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. कृष्णा सकवान ८१.१०% याने द्वितीय क्रमांक तर जान्हवी काटकर ८०.१०% हिने तृतीय क्रमांक मिळवला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नवघरे, प्राध्यापक वर्ग आणि कर्मचाऱ्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नांदेड एज्युकेशन सोसायटीचा ७६ वा वर्धापन दिन उत्साहात

## 'आय लव्ह पीपल्स कॉलेज' सेल्फी पॉईंट, स्वामीजी कुटीचे उद्‌घाटन

**नांदेड (प्रतिनिधी)–** हैदराबाद मुक्ती संग्रामाचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या ध्येयाने २६ जून १९५० रोजी स्थापन केलेल्या नांदेड एज्युकेशन सोसायटीचा ७६ वा वर्धापन दिन शुक्रवारी विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी पीपल्स कॉलेज परिसरात उभारण्यात आलेल्या आकर्षक 'आय लव्ह पीपल्स कॉलेज' सेल्फी पॉईंटचे तसेच विद्यार्थ्यांच्या विश्रांतीसाठी बांबूपासून पर्यावरणपूरक पद्धतीने उभारलेल्या आणि 'स्वामीजी कुटी' असे नामकरण करण्यात आलेल्या कुटीचे उद्‌घाटन माजी खासदार तथा सोसायटीचे माजी अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या हस्ते करण्यात आले.




कार्यक्रमास नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील, उपाध्यक्ष प्रफुल्ल अग्रवाल, सचिव श्यामल पत्की, सहसचिव अ‍ॅड. प्रदीप नागापूरकर, कार्यकारिणी सदस्य अ‍ॅड. चिरंजीलाल दागडीया, नगरसेविका शांभवी साले, नौनिहालसिंग जहागीरदार, डॉ. यशपाल भिंगे, प्रा. विलास वडजे, राहुल गोरे, डॉ. ए. टी. शिंदे, पीपल्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, उपप्राचार्य डॉ. विशाल पतंगे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे म्हणाले, आजच्या डिजिटल युगात एखाद्या महाविद्यालयाची ओळख केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरती मर्यादित राहत नाही, तर विद्यार्थ्यांना आकर्षित करणाऱ्या परिसरातील वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांमुळेही होते. सेल्फी पॉईंट हे आजच्या पिढीशी संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम बनले आहे. याच विचारातून पीपल्स कॉलेजमध्ये प्रथमच भव्य आणि आकर्षक 'आय लव्ह पीपल्स कॉलेज' सेल्फी पॉईंट उभारण्यात आला आहे. हा सेल्फी पॉईंट संस्थेची ओळख अधिक व्यापक करेल आणि विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थी यांच्यासाठी आकर्षणाचे नवे केंद्र ठरेल.

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या योजनेसाठी गरजू लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. जिल्हा कार्यालय नांदेडच्या वतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ५० टक्के अनुदान योजनेअंतर्गत ४०, बीजभांडवल योजनेअंतर्गत ४० आणि थेट कर्ज योजनेअंतर्गत ८० लाभार्थ्यांचे उदिष्ट प्राप्त झाले आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील गरजू लाभार्थ्यांकडून https://mahadisha.mpbcdc.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

लाभार्थ्यांची वयोमर्यादा १८ ते ४५ वर्षे असणे अनिवार्य असून ऑनलाईन अर्ज करताना जातीचा व उत्पन्नाचा मूळ दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, रेशन कार्ड झेरॉक्स प्रत, आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड, आधारलिंक असलेल्या बॅंकेच्या पासबुकची झेरॉक्स, टी.सी. व मार्क मेमोसारखी शैक्षणिक कागदपत्रे, व्यवसायाचे कोटेशन, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, उद्यम आधार, शॉप अ‍ॅक्ट, संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षण किंवा अनुभव प्रमाणपत्र आणि दोन पासपोर्ट फोटो इ. कागदपत्राची प्रामुख्याने आवश्यकता आहे.

संकेतस्थळावर यशस्वीरित्या ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्या अर्जाच्या दोन प्रती नमस्कार चौक ग्यानमाता शाळेसमोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जिल्हा कार्यालय नांदेड येथे प्रत्यक्ष जमा करणे आवश्यक आहे. या योजनेची सविस्तर माहिती पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. जिल्हातील जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांनी वेळेत ऑनलाईन अर्ज करुन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाचे नांदेड जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# सहशिक्षक मारोती पेंटे सेवानिवृत्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** तेहतीस वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियतवयोमानानुसार कुसुमताई प्राथमिक शाळा सिडकोचे सहशिक्षक मारोती गोविंदराव पेंटे हे ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.



सेवानिवृत्ती निमित्ताने शाळेच्या वतीने त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

पेंटे यांच्या सेवानिवृत्तीबद्दल कुसुमताई प्राथमिक शाळेच्यावतीने सचिव संभाजी बिरादार, माध्यमिक मुख्याध्यापक शशीकला बिरादार, प्राथमिक मुख्याध्यापक कारामुंगे यू.डी व मान्यवरांच्या उपस्थितीत सपत्नीक सत्कार करण्यात आला आहे. या कार्यक्रमात अनेकांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने वाटप योजनेत त्रुटीची पुर्तता करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने सन २०२५-२६ मध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नोंदणीकृत बचत गटांना ९ ते १८ अश्वशक्तीचे मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने ९० टक्के अनुदानावर वाटप करण्यात येणार आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणे या योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी ज्या बचत गटांनी विहित मुदतीत अर्ज प्राप्त करून घेतलेले आहेत. परंतु सदरचा अर्ज भरून परत समाज कल्याण कार्यालयाकडे सादर केलेला नाही व ज्यांचे अर्ज तपासणी अंती त्रुटीत आहेत अशा सर्व बचत गटांनी आपले अर्ज सादर करण्यासाठी व त्रुटी पुर्तता करण्यासाठी शेवटची तारीख ३ जुलै २०२६ देण्यात आली आहे. तद्नंतर आलेल्या अर्जाचा अथवा त्रुटींचा विचार केला जाणार नाही, ही शेवटची संधी आहे, याची सर्व बचत गटांनी गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी.

तरी लाभार्थी बचतगटांनी तत्काळ आपले अर्ज सादर करावेत व ज्यांचे अर्ज त्रुटीत आहेत त्यांनी त्रुटी पुर्तता करावी, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

# प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे तालुक्याच्या ठिकाणी शिकाऊ व पक्के अनुज्ञप्ती शिबिराचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे शिकाऊ व पक्के अनुज्ञप्तीसाठी माहे जुलै ते डिसेंबर २०२६ या महिन्यात तालुका शिबीर कार्यालयाचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरासाठी जागा उपलब्धतेच्या आधीन राहून ऑनलाईन अपॉईटमेंट महिना सुरुवात होण्याच्या ५ दिवस आधी कार्यालयीन वेळेत सुरु करण्यात येईल. तरी अपॉईटमेंट घेतलेल्या अर्जदारांनी याची नोंद घेऊन शिबीर कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांतराव साळी यांनी केले आहे.

तालुकानिहाय कॅम्पचे ठिकाण व दिनांक पुढीलप्रमाणे आहे. कंधार येथे ३ जुलै, ३ ऑगस्ट, ३ सप्टेंबर, ५ ऑक्टोबर, ३ नोव्हेंबर, २ डिसेंबर २०२६ या दिवशी आहे. धर्माबाद येथे ६ जुलै, ६ ऑगस्ट, ७ सप्टेंबर, ७ ऑक्टोबर, ५ नोव्हेंबर, ४ डिसेंबर २०२६ दिवशी आहे. किनवट ९ जुलै, १० ऑगस्ट, ९ सप्टेंबर, ९ ऑक्टोबर, १२ नोव्हेंबर, १० डिसेंबर २०२६ या दिवशी आहे. मुदखेड येथे १३ जुलै, १३ ऑगस्ट, ११ सप्टेंबर, १२ ऑक्टोबर, १६ नोव्हेंबर, १४ डिसेंबर यादिवशी आहे. माहूर येथे १६ जुलै, १७ ऑगस्ट, १६ सप्टेंबर, १६ ऑक्टोबर, १८ नोव्हेंबर, १६ डिसेंबर या दिवशी आयोजन करण्यात येणार आहे. हदगाव येथे २० जुलै, २० ऑगस्ट, २१ सप्टेंबर, २१ ऑक्टोबर, २० नोव्हेबर, २१ डिसेंबर यादिवशी आहे.

धर्माबाद येथे २३ जुलै, २५ ऑगस्ट, २४ सप्टेंबर, २३ ऑक्टोबर, २५ नोव्हेंबर, २३ डिसेंबर या दिवशी तर हिमायतनगर येथे २७ जुलै, २७ ऑगस्ट, २८ सप्टेंबर, २८ ऑक्टोबर, २७ नोव्हेंबर, २८ डिसेंबर २०२६ या दिवशी आहे. किनवट येथे ३० जुलै, ३१ ऑगस्ट, ३० सप्टेंबर, ३० ऑक्टोबर, ३० नोव्हेंबर, ३० डिसेंबर २०२६ या दिवशी आयोजन करण्यात आले आहे. यानुसार शिकाऊ व पक्क्या अनुज्ञप्तीसाठी तालुक्याच्या ठिकाणी मासिक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

# अनुसूचित जातीतील हिंदू खाटीक समाजीतील लाभार्थ्यांसाठी कर्ज-अनुदान योजना

**नांदेड (प्रतिनिधी)–** हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्यादित (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित यांची उपकंपनी) नांदेड जिल्हा कार्यालयामार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी विविध कर्ज आणि अनुदान योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेसाठी मुख्यालयाकडून उद्दीष्ट प्राप्त झाले आहे.

या अंतर्गत अनुदान योजनेसाठी- ५, बीजभांडवल योजनेसाठी ५, थेट कर्ज योजनेसाठी १०, एनएसएफडीसी टर्म लोनसाठी ४, एनएसएफडीसी सूक्ष्म पतपुरवठयासाठी ३, आणि एनएसएफडीसी उच्च शैक्षणिक कर्ज योजनेसाठी ३ असे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. अनुसूचित जातीतील हिंदू खाटीक समाजातील पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असणे आवश्यक आहे. अर्जासोबत जातीचा व उत्पन्नाचा मूळ दाखला, रेशनकार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड, आणि मतदान ओळखपत्राची झेरॉक्स प्रत, रहिवासी प्रमाणपत्र, व्यवसायाचे कोटेशन, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, आधार लिंक असलेल्या बँकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत, उद्यम आधार, टी.सी. व मार्क मेमोसारखी शैक्षणिक कागदपत्रे, संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षण व अनुभव प्रमाणपत्र, व्यवसाय परवाना (शॉप अ‍ॅक्ट) आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडणे अनिवार्य आहे.

इच्छुक पात्र लाभार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नमस्कार चौक, ग्यानमाता शाळे समोर नांदेड येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा, असे हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्या. नांदेडचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयाला सलग तिसऱ्यांदा 'दिशा अभियान' शिकणं उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयाने 'दिशा अभियान' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल विद्यालयाचा नुकताच विशेष सन्मान करण्यात आला आहे. विशेष म्हणजे विद्यालयाने सलग तिसऱ्यांदा हे प्रमाणपत्र पटकावले असून, या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, सहायक सल्लागार दिनकर नाठे आणि दिशा अभियानाचे समन्वयक संघरत्न धुतराज, साजिद मुल्ला यांच्या हस्ते हे उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. विद्यालयाच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक मधुकर मनूरकर, गणेश धुळे, आनंद शर्मा, डॉ. मनिषा तिवारी, संगीता नरवाडे, सरस्वती झाकडे आदींनी हे प्रमाणपत्र स्वीकारले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी या यशाबद्दल शाळेचे आणि व्यवस्थापनाचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

'दिशा अभियान' अंतर्गत दिला जाणारा अभ्यासक्रम अत्यंत प्रभावीपणे आणि उत्कृष्टरीत्या राबवल्यामुळेच शाळेला हा बहुमान मिळाला आहे. सलग तिसऱ्यांदा हे मानाचे प्रमाणपत्र मिळाल्यामुळे शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण असून, सर्वांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

या यशाची दखल घेत राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी शाळेच्या संपूर्ण चमूचे कौतुक केले आहे. राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, उपाध्यक्ष कमल कोठारी, सचिव प्रकाश मालपाणी, सहसचिव डॉ. लक्ष्मीकांत बजाज, कोषाध्यक्ष जयप्रकाश काबरा, सदस्य बनारसीदास अग्रवाल, अंकित अग्रवाल यांनी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक आणि कर्मचारी यांचे या यशाबद्दल विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

# नायगाव येथे मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत कुक्कुटपालन प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)–** पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. एस. बी. खुणे यांच्या संकल्पनेतून तसेच सहायक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नायगाव डॉ. गौतम खिल्लारे यांच्या नियोजनाखाली तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, नायगाव, जि. नांदेड येथे मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना अंतर्गत कुक्कुटपालनविषयक ५ दिवसीय प्रशिक्षण शिबिरास आज उत्साहात प्रारंभ झाला.

या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील एकूण १३० प्रशिक्षणार्थ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. शासनमान्य अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षणार्थींना कुक्कुटपालन व्यवसायाचे शास्त्रीय व्यवस्थापन, रोग प्रतिबंधक उपाययोजना, खाद्य व्यवस्थापन, निवास व्यवस्था, लसीकरण, आर्थिक नियोजन तसेच शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.

प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना शासकीय मान्यताप्राप्त प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार असून, हे प्रमाणपत्र मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेसह विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.


या प्रशिक्षण उपक्रमामुळे ग्रामीण भागातील युवक, महिला व शेतकरी यांना स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होऊन कुक्कुटपालन व्यवसायाला चालना मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# मान्सून अन् स्किन केअर टिप्स....

**पावसाळ्यात हवेत ओलावा जास्त असतो, त्यामुळे चेहरा पुन्हा पुन्हा स्वच्छ करावा लागतो. याशिवाय पावसाळ्यात अनेक प्रकारचे संसर्ग पसरतात, त्यामुळे आजारांसोबतच त्वचेशी संबंधित समस्याही उद्भवतात. पावसाळ्याच्या दिवसात, त्वचेची छिद्रात घाण अडकणार नाहीत म्हणून दिवसातून दोन-तीन वेळा चेहरा धुणे गरजेचे असते. पण त्वचेची काळजी घेताना काही छोट्या चुका करतो. पण या क्षुल्लक वाटणाऱ्या चुकांचा परिणाम त्वचेवर खोल होतो. म्हणूनच या काळात तुम्ही त्वचेची काळजी घेणं गरजेचं असते. यासाठी तुम्ही या १० गोष्टी फॉलो करू शकता. चला तर मग जाणून घेऊयात कोणत्या आहेत त्या गोष्टी.**



» अँटी-बॅक्टेरियल टोनर : या काळात त्वचेची काळजी घेण्याची घेणं गरजेच असतं. यावेळी सौम्य क्लिंजर वापरावे. याशिवाय तुम्ही त्वचेला पपई देखील लावू शकता. जर तुमची त्वचा तेलकट असेल तर एक लहान चमचा पाण्यात लॅव्हेंडर तेल टाकून चेहऱ्याला लावा. यामुळे त्वचेला आराम मिळतो.

» बुरशीजन्य संसर्गाचा धोका : पावसाळ्यात तुम्ही रोज रात्री अँटी-बॅक्टेरियल टोनर लावून झोपावे कारण ते त्वचेची पीएच पातळी योग्य ठेवते. त्याच प्रमाणे या काळात बुरशीजन्य संसर्गाचा धोका खूप वाढतो. हे टाळण्यासाठी दिवसातून किमान दोन-तीन वेळा चेहरा धुवा. यावेळी तुमच्या त्वचेला योग्य असेल असा फेसवॉश देखील लावू शकता.

» त्वचेला मॉइश्चरायझ करा : पावसाळ्यात त्वचेला एक्सफोलिएट करायला विसरू नका. यासाठी मध आणि साखरेचा स्क्रब वापरा. साखर मृत त्वचा काढून टाकून छिद्र बंद करण्यास मदत करते, तर मध त्वचेला मॉइश्चरायझ करते आणि मऊ करते. त्याच प्रमाणे ग्रीन टी, लिंबू आणि काकडी यांसारखे नैसर्गिक टोनर वापरा. टोनिंगमुळे त्वचेतील काही घाणही निघून जाईल आणि त्वचा कोरडीही होणार नाही.

» सनस्क्रीन लावा : पावसात चेहऱ्याशिवाय पाय आणि हातांना सर्वाधिक संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे पावसात भिजण्याचा प्रयत्न करा. ओले झाल्यास थोडे कोमट पाणी घालून त्यात लिंबाचा रस घाला. त्यानंतर त्या पाण्यात पाय टाका. त्याच कोमट पाण्याने हात आणि हात धुवा. रोज किमान 8 ग्लास पाणी प्या आणि सनस्क्रीन लावायला विसरू नका. पावसाळ्यात जरी सूर्य नसेल तरी सूर्यांच्या धोकादायक किरणांचा त्वचेवर वाईट परिणाम होतो. त्यामुळे सनस्क्रीन लावायला विसरु नका.

## वाढवा सौंदर्य

पावसाळ्यात आंघोळ करताना एकदम गरम पाणी न वापरता जरा कोमट पाणी वापरावं. एकदम कडक पाण्यामुळे त्वचा कोरडी होते आणि काळवंडतेही. पावसाळ्यात चेहरा धुताना योग्य क्लिंझर वापरणं त्वचेसाठी फायदेशीर ठरतं. यासाठी हळदीच्या लेपाचा उपयोग करता येईल. साबण वापरल्यामुळे त्वचा स्वच्छ झाल्याचा फील येतो पण तो वरवरचा आणि तात्पुरता असतो. साबणाच्या अतिवापरामुळे त्वचेमधील नैसर्गिक तेल शोषलं जातं. ज्यामुळे त्वचा कोरडी आणि निस्तेज होते. आणि म्हणूनच त्याचा वापर कमी करा. आंघोळीच्या वेळी त्वचेवर थोडंसं दूध आणि बेसनाचं पीठ लावल्यासही फायदा होऊ शकतो.

## भरपूर पाणी प्या

शरीराला विषारी पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्या जेणेकरून मुरुम आणि मुरुम बाहेर येणार नाहीत. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडत असली तरी त्यामुळे त्वचेची खोल छिद्रे बंद होतात, त्यामुळे आत असलेली घाण बाहेर येऊ शकत नाही. परिणामी, चेहऱ्यावर मुरुम आणि पुरळ दिसतात आणि त्वचा तेलकट होते. त्यामुळे मेकअप लावला तरी तो चांगला काढा. मेकअप काढण्यासाठी बदाम तेलाचा वापर करा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही खोबरेल तेल किंवा बेबी वाइप्सचा देखील वापरू शकता. त्वचा हाय हायड्रेटेड ठेवण्यासाठी पाण्याच्या सेवनाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. जेव्हा तुम्ही पाणी पिता, तेव्हा तुमच्या त्वचेसह तुमचे अवयव ओलावा शोषून घेतात. दिवसभर भरपूर पाणी पिणे आणि कॉफी आणि अल्कोहोलपासून दूर राहणे त्वचेला हायड्रेट ठेवण्यास मदत करते.

# शुष्क केस सांभाळा!



**फ्रिझी किंवा शुष्क केस असलेल्या व्यक्तीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अशा केसांनी सुधारण्यासाठी अनेक उपाय केले जातात. याच समस्येवर उपाय म्हणून आम्ही काही उपाय सांगितले आहेत.**

पावसाळ्यात ओल्या कपड्यांसोबत फ्रिझी हेअरसुद्धा खूप मोठी समस्या निर्माण होते. पावसाळ्यातील आर्द्रतेमुळे घाम आणि चिकटपणाचा त्रास होतो, तर दुसरीकडे केस रेशमी दिसण्याऐवजी फुगलेले आणि कुरळेपणामुळे विखुरलेले दिसतात. पण या काळात काही छोटे उपाय करुन तुम्ही खूप चांगले केस मिळवू शकता. चला तर मग जाणून घेऊयात कोणते आहेत ते उपाय...

» असा निवडा शॅम्पू : केसांमध्ये कमी प्रमाणात शॅम्पू लावा. आठवड्यातून दोन वेळा केस धूवा त्यामुळे केसांचा पोत सुधारण्यास मदत होईल. पण या काळात केस चांगल्या पद्धतीने वाळवा, ते ओले ठेवू नका.

» उशीचे कवर घेताना हा विचार करा : केसांचा फ्रिझीपणा कमी करण्यासाठी उशीचे कवर घेताना नक्की विचार करा. सिल्कच्या कपड्याचा वापर करा. त्यामुळे केसांचे नुकसान होत नाही. त्यामुळे केसांना त्रास होणार नाही.

» कंडीशनिंग : पावसाळ्यात केसांची जास्त काळजी घेणं गरजेच असते. त्यामुळे केसांना योग्य पद्धतीने कंडीशनिंग करा. त्यासाठी कोकोनट ऑईल वापर तुम्ही करु शकता.

» हेअर मास्क : या दिवसात तुम्ही केसांना हेअर मास्क देखील लावू शकता. यासाठी मुलतानी माती आणि गुलाबपाणीचा वापर घरी हेअर पॅक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो. या पॅकमुळे टाळूतील तेल साफ करताना कोंडाही कमी होईल. यामुळे



केस स्वच्छ दिसतील आणि स्वच्छ वाटतील. यासोबतच केसांवर हेअर प्रोडक्ट्सचा वापर कमी करा.

» असं सुकवा केस : ओले केस खूप नाजूक असतात. त्यामुळे केस सुकवताना मोठ्या कोमचा वापर करा. त्यामुळे केसांचे गळणे कमी होईल. या दिवसात केस ओले ठेवू नका.

# पावसाळ्यात त्वचा ठेवा हायड्रेट..!

**नैसर्गिकरित्या चमकदार आणि सुंदर त्वचा हायड्रेट असणं महत्त्वाचे आहे. त्वचेच्या डिहायड्रेशनमुळे त्वचा निस्तेज आणि कोरडी तर दिसतेच पण त्यामुळे त्वचेवर अधिक सुरकुत्या पडतात. तसेच डोळ्यांखाली काळी वर्तुळाची समस्या असू शकते. त्यामुळे तुमची त्वचा हायड्रेट ठेवण्यासाठी पुरेशी पावले उचलणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जेव्हा त्वचा हायड्रेट ठेवण्याचा प्रश्न येतो तेव्हा लोशन आणि मॉइश्चरायझिंग क्रीम वापरण्याचा सल्ला दिला जातो. हे खरे आहे की क्रीम किंवा मॉइश्चरायझर्स तुमच्या त्वचेची आर्द्रता राखण्यास मदत करतात. पण याशिवाय त्वचेच्या पोषणाकडेही लक्ष दिले पाहिजे. चला तर मग जाणून घेऊयात अतिशय सोप्या पद्धतीने आपण त्वचा हायड्रेट कशा प्रकारे ठेवू शकतो.**

» लोशनचा वापर करा : लोशन, क्रीम किंवा फेस क्रीमच्या मदतीने त्वचा हायड्रेट ठेवा. यासाठी तुम्ही मॉइश्चरायझिंग क्रीमपासून ते पेट्रोलियम जेलीपर्यंत अनेक स्किनकेअर उत्पादनांची मदत घेऊ शकता.



» सनस्क्रीन वापरा : सनस्क्रीन वापरा. थेट सूर्यप्रकाशामुळे तुमची त्वचा निर्जलीकरण होऊ शकते. अशा परिस्थितीत, जर तुम्ही SPF 30 किंवा त्याहून अधिक सनस्क्रीन लावले तर तुमची त्वचा चांगली राहू शकते.

» नैसर्गिक तेलांचा वापर : त्वचेला हायड्रेट करण्यासाठी नैसर्गिक तेलांचा वापर करा. त्यामुळे तुमच्या स्किन केअरमध्ये तुम्ही नैसर्गिक तेलांचा वापर करु शकता. त्याच प्रमाणे त्वचेचे हायड्रेशन राखण्यासाठी गरम पाण्याने शॉवर घेणे टाळा.

» सौम्य उत्पादने वापरा : चेहराला स्वच्छ करण्यासाठी नेहमी सौम्य क्लिंनर वापरा. ज्या उत्पादनांमध्ये केमिकल्स असतात त्यामुळे त्वचेला त्रास होतो. अशी उत्पादने त्वचेची नैसर्गिक तेल काढून टाकते. म्हणूनच, नेहमी एक सौम्य उत्पादने निवडा जी तुमच्या त्वचेला स्वच्छ करतील आणि त्याची काळजी घेतील.

# जीन्स न धुता अशी करा स्वच्छ

**पावसाळ्याचं वातावरण म्हणजे सतत दमटपणा आणि ओलावा. अशा वातावरणात साधे कपडे लवकर सुकत नाहीत तर जीन्ससारखे जाड कापड कसे लवकर सुकणार. धुतलेली जीन्स दोन ते तीन दिवसात कोरडी झाली नाही तर तिला खूप घाणेरडा दुर्गंध येण्यास सुरुवात होते. अशी ही कोणत्याच ऋतूत खरंतर जीन्स सतत धुतली जात नाही. कारण जीन्स न धुता घालणं हा एक ट्रेंडच आहे. म्हणूनच जीन्स जरी धुतली नाही तरी ती स्वच्छ आणि निर्जंतूक कशी करावी हे प्रत्येकाला माहीत असायला हवं. जीन्स खूप दिवस वापरल्यानंतर, ती नीट सुकली नाही म्हणून जीन्समधून येणारा हा घाणेरडा वास तुम्ही काही क्षणात कमी करू शकता. यासाठी फॉलो करा या सोप्या टिप्स...**



- जीन्स वापरल्यावर हवेवर सुकत ठेवा : जीन्स वापरल्यावर अनेकांना तिची घडी घालून वॉर्डरोबमध्ये ठेवण्याची सवय असते. मात्र तुम्ही जेव्हा जीन्स वापरता तेव्हा तुम्हाला नेहमीपेक्षा जास्त घाम येतो. हा घाम तुमच्या जीन्समध्ये मुरतो आणि जीन्सला घाणेरडा वास येतो. यासाठीच जर तुम्हाला जीन्स धुण्याची गरज वाटत नसेल तर तुम्ही हवेवर अथवा उन्हात वाळत घालून तुमची जीन्स सुकवू शकता. ताजी हवा आणि सूर्यकिरणांमुळे तुमची जीन्स बॅक्टेरिआ फ्री होते.
- जीन्सला इस्त्री करा : जीन्स न धुता घालायची असेल तर हा उपाय पावसाळ्यात नक्कीच प्रभावी ठरेल. कारण जीन्सचे कापड लवकर खराब होत नाही. त्यामुळे ती सतत धुण्याची गरज नसते. त्याऐवजी तुम्ही जर जीन्सला फक्त स्टीम केलं अथवा इस्त्री केली तर जीन्सवरील जीवजंतू कमी होतात आणि ती पुन्हा घालण्यासाठी योग्य होते. यासाठी जीन्स आतून आणि बाहेरून व्यवस्थित इस्त्री करा आणि मगच परिधान करा.
- लिंबू पाण्याचा स्प्रे मारा : जीन्स न धुता स्वच्छ करण्याचा हा आणखी एक सोपा उपाय आहे. हॉस्टेलमध्ये राहताना अथवा बॅचरल लाईफसाठी हा तुमच्या नक्कीच सोईचा आहे. यासाठी एका स्प्रे बॉटलमध्ये पाणी आणि थोडं लिंबाचा रस मिक्स करा. जीन्स वापरल्यानंतर कंबर आणि जीन्सच्या आतील बाजूने हे पाणी जीन्सवर स्प्रे करा आणि हवेवर वाळत ठेवा. ज्यामुळे जीन्समधील जीवजंतू नष्ट होतील आणि जीन्सला घाणेरडा वास येणार नाही.
- बेकिंग सोडा वापरा : बेकिंग सोडा तुम्ही घराच्या साफसफाईसाठी वापरत असालच. आता तुम्ही तुमच्या जीन्सच्या स्वच्छतेसाठीदेखील बेकिंग सोडा वापरू शकता. जीन्समधून येणारा घाणेरडा वास यामुळे कमी होतो. यासाठी बेकिंग सोडा पाण्यात मिसळून त्याची जाडसर पेस्ट तयार करा. ही पेस्ट तुम्ही जीन्सच्या कंबरेकडील आणि इतर भागाकडे लावू शकता. पेस्ट सुकल्यावर ब्रशने ती झाडून टाका. यामुळे तुमची जीन न धुता स्वच्छ आणि उजळ होईल.

# पावसाळी चप्पला लागून जखमा?



**पावसाळ्यात प्रवासाच्या वेळी आपल्या इतर सीझनच्या चप्पला कितीही ब्रँडेड असल्या तरी घसरून पडण्याची भीती असते. अशावेळी साध्यासरळ प्लास्टिकने बनवलेल्या मान्सून चप्पला तुमचा त्रास वाचवू शकतात. फॅशन प्रेमी मंडळींमुळे या मान्सून चप्पलांच्या सुद्धा भन्नाट डिझाइन्स मार्केटमध्ये आलेल्या आहेत. पण बहुतांश लोकांना या चप्पला वापरणे ही त्रासदायक ठरते याचे मुख्य कारण म्हणजे शू बाईट. जर प्लॅस्टिक चप्पलच्या कडा नीट मोल्ड केलेल्या नसतील तर पायाच्या मागील बाजूला घर्षण झाल्याने जखमा होऊ शकतात. अशात तुम्ही पावसाच्या पाण्यात फिरत असाल तर जखम आणखीनच चिघळण्याची सुद्धा शक्यता असते. शिवाय इन्फेक्शनचा धोका असतो तो वेगळाच! काही जण तर म्हणून अशा चप्पला नव्या कोऱ्या असतानाच फेकून देतात. मात्र असे पैसे वाया घालवण्यापेक्षा या सगळ्यावर उपाय म्हणून तुम्हाला काय करता येईल हे आपण पाहूया...**

एरवी अशी जखम झाल्यास ती उघडी ठेवून सुकू द्यावी असे अनेकजण सांगतात पण पावसाळ्यात अशी जोखीम पत्करणे धोक्याचे ठरते. जखमेला पाण्याचा अधिक स्पर्श होऊ नये यासाठी आधी कोरड्या कपड्याने किंवा माउस कापसाने जखम व आसपासचा भाग पुसून काढा व त्यावर एखादी अँटी बॅक्टरीयल क्रीम व बँडेज लावा. तुम्ही नव्या चप्पल घेत असल्यास अगोदर पायाच्या अंगठ्याच्या व करंगळीच्या शेजारी व मागील बाजूस बँडेज लावणे उत्तम ठरेल. अनेकदा फोड येतानाच त्यात पाणी गेलेले असते, अनेकांना असे फोड फोडण्याची सवय असते मात्र असे केल्याने संसर्ग वाढू शकतो त्यामुळे जखम चिघळण्याचा प्रयत्न करू नका. तुम्ही काही बर्फाचे तुकडे एका स्वच्छ कपड्यात गुंडाळू शकता आणि शू बाईट झालेल्या भागात लावू शकता. याशिवाय पायाला आलेली सूज दूर करण्यासाठी देखील हा उपाय उत्तम आहे. तुम्ही रोज दात घासण्यासाठी वापरता तीच टूथपेस्ट तुम्हाला शू बाईटपासून सुद्धा आराम देऊ शकते. थोडी पेस्ट बोटावर घेऊन शू बाईट झालेल्या भागात लावा. तुम्ही व्हॅसलिनसारखीच एखादी पेट्रोलियम जेली सुद्धा वापरू शकता. अलीकडे पँटी लायनर्स म्हणून एक प्रकार चर्चेत आहे. डायपर किंवा सॅनिटरी पॅड सारखाच पण लहान आकाराचा हा लायनर तुम्ही चप्पलांच्या मागील बाजूस वापरू शकता. दरम्यान, नव्या चप्पला विकत घेतानाच त्या योग्य साईजमध्ये घ्या. काहींना आपल्या पायाच्या आकारापेक्षा मोठ्या चप्पला वापरायची सवय असते पण यामुळे पाय व चप्पलमध्ये जास्त जागा राहून घर्षण अधिक होण्याचा धोका असतो यापेक्षा योग्य मापाची चप्पल घेणे कधीही उत्तम.

# पावसाळ्यात 5 टिप्स वापरा, चेहऱ्याला येईल चमक!

**पावसाळ्यात वातावरणातील आर्द्रता वाढू लागते. यामुळे त्वचा कोरडी पडण्याची शक्यता असते. पण जर तुमची त्वचा कोरडीच असेल तर यामुळे समस्या अधिकच वाढू शकते. पावसाळ्यात आपण पाणीसुद्धा कमी प्रमाणात पितो. त्यामुळे शरीर आणि त्वचा डिहायट्रेट होऊन कोरडी पडते. पावसाळा सुरू होतात ड्राय स्कीन असलेल्या लोकांनी त्वचेची योग्य निगा राखायला हवी. यासाठी पावसाळ्यात फॉलो करा या कोरड्या त्वचेसाठी या स्कीन केअर टिप्स. हे उपाय फॉलो करून पावसाळ्यातही तुम्ही सुंदर त्वचा मिळवू शकता...**

- पाण्याची कमतरता करू नका : पावसाळ्यात वातावरणात बदल होतो. अशा वातावरणात जरासे जरी उन पडले तर भरपूर घाम येतो. या घामावाटे शरीरातील सर्व पाणी कमी होते. त्यामुळे त्वचा कोरडी होते. म्हणूनच या काळात भरपूर पाणी प्या. या काळात दिवसभरात जवळजवळ आठ ते दहा ग्लास पाणी पिणे गरजेचे असते. पाण्यासोबतच तुम्ही लिंबू पाणी, नारळपाणी, पिऊ शकता.
- मॉइस्चराइरचा वापर : त्वचेला पोषण देण्यासाठी मॉइस्चराइर गरजेचे असते. त्यामुळे जर त्वचा हाताला रखरखीत लागत असेल तर तुमच्या त्वचेला मॉइस्चरायझरची गरज आहे. स्कीन केअर रूटिनमध्ये यासाठी योग्य मॉइस्चराइझरची निवड करा. पावसाळ्यात तुम्ही जेल बेस्ड मॉइस्चराइझर वापरू शकता.
- कोमट पाण्याने अंघोळ करा : पावसाळ्यात वातावरणात थंडावा वाढू लागताच तुम्ही गरम पाण्याने अंघोळ करू लागता. मात्र अति गरम पाण्याने अंघोळ केल्यामुळे तुमच्या त्वचेचा मऊपणा कमी होतो. त्वचा कोरडी आणि रखरखीत होते. यासाठी पावसाळ्यात जरी वातावरण थंड असलं तरी कोमट पाण्याने अंघोळ करा.



- योग्य आहार घ्या : पावसाळ्यात तुम्ही काय खाता हे खूप महत्त्वाचं आहे. या दिवसांमध्ये तेलकट, चमचमीत पदार्थ मोठ्या प्रमाणावर खाल्ले जातात. ज्याचा नकळत परिणाम तुमच्या त्वचेवर होत असतो. यासाठी योग्य आणि संतुलित आहार घेण्यावर भर द्या. आहारात भरपूर सॅलेड, ताज्या भाज्यांचा तुमच्या आहारात समावेश करा.
- आठवड्यातून एकदा स्क्रबिंग : चेहरा धुतल्यानंतर मॉईश्चराइज अवश्य लावावं आणि आठवड्यातून एकदा स्क्रबिंग करावं. या लहान-लहान गोष्टींची आपण काळजी घेतली तर पावसाळ्यात आपल्या त्वचेचं रक्षण करू शकाल आणि आपण हेल्दी त्वचा मिळवू शकतो.

# नैसर्गिक व तंत्रज्ञानाधारित शेतीत महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल - राज्यपाल

**मुंबई (प्रतिनिधी)** – दिवंगत वसंतराव नाईक यांनी शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी दूरदृष्टीने अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. सत्तरच्या दशकात महाराष्ट्र भीषण दुष्काळाचा सामना करत असताना त्यांनी कृषी क्षेत्राला नवी दिशा दिली. राज्यात कृषी विद्यापीठांच्या स्थापनेत त्यांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे कृषी विभागातर्फे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै या कृषि दिनानिमित्त आयोजित कृषि पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते.

कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे,जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, आयुक्त सुरज मांढरे यासह राज्यातील कृषि पुरस्कार विजेते उपस्थित होते.डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार

## राज्यस्तरीय कृषी पुरस्कार २०२३-२४ चे वितरण




२०२३ कोल्हापुर विभाग मधून मु.पो.तळसंदे, ता.हातकणंगले, येथील डॉ.संजय ज्ञानदेव पाटील यांना तर २०२४ चा ठाणे विभागातून जि.पालघर, ता. तलासरी, मु.पो.ब्राम्हणगाव (झाई बोरीगाव) येथील यज्ञेश वसंत सावे यांना तीन लाखांचे पारितोषिक व सन्मानपत्र वितरण करण्यात आले. कृषि विभागात प्रातिनिधीक स्वरूपात लॅपटॉपचे वितरण करण्यात आले.

२०२३ व २०२४ साठी १८९ पुरस्कारार्थी डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कारासाठी राज्यातून एक पुरस्कारार्थी असून रूपये तीन लाखांचे पारितोषिक व सन्मानपत्र वितरण करण्यात आले. २०२३ व २०२४ मध्ये दोन विजेते आहेत. वसंतराव नाईक कृषिभूषण ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) दोन लाख रूपये असे प्रमाणे २०२३ मध्ये ६ व २०२४ साठी ८ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. जिजामाता कृषिभूषण पुरस्कार ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) दोन लाख रूपये असे प्रमाणे २०२३ मध्ये ८ व २०२४ मध्ये ८ पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती) मध्ये ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) दोन लाख रूपये असे प्रमाणे २०२३ मध्ये ७, २०२४ मध्ये ८ पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार मध्ये ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) १ लाख २० हजार रूपये असे प्रमाणे २०२३ मध्ये ७, २०२४ मध्ये ८ पुरस्कार, युवा शेतकरी मध्ये ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) १ लाख २० हजार रूपये पारितोषिक रक्कम सन २०२३ मध्ये ८, २०२४ मध्ये ८ पुरस्कार, उद्यान पंडित ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) १ लाख रूपये पारितोषिक रक्कम २०२३ मध्ये ८, २०२४ मध्ये ८ पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कारामध्ये ४० (सर्वसाधारण प्रवर्ग साठी प्रति जिल्हा १ याप्रमाणे ३४ व आदिवासी प्रवर्ग साठी प्रति विभाग १ याप्रमाणे ०६) ४४ हजार रूपये पारितोषिक रक्कम, २०२३ मध्ये ३६, २०२४ मध्ये ३९ पुरस्कार, सेवारत्न पुरस्कारासाठी १० (प्रति विभाग १ याप्रमाणे ८, कृषी आयुक्तालय स्तर-१ व मंत्रालय स्तर -१) २०२३ मध्ये १० २०२४ मध्ये १० पुरस्कारांचे वितरणा करण्यात आले असे एकूण २०२३ साठी ९१ व २०२४ साठी ९८ एकूण १८९ पुरस्कारार्थींना पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

# मृत्यूपश्चात केतन अग्रवालची थट्टा उडवणारी महिला डॉक्टर पाच वर्षांसाठी निलंबित

**पुणे (प्रतिनिधी)** – पुण्याच्या लोहगड किल्लयावर ट्रेकिंगला गेलेल्या केतन अग्रवालचा पाय घसरून दरीत पडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडलेली. सुरुवातीला अपघात वाटणाऱ्या या घटनेनं सर्वांना अक्षरशः हादरवून सोडलं. पुणे पोलिसांच्या तपासात एक अत्यंत खळबळजनक आणि थरारक खुलासा झाला. हा अपघात नसून, होणाऱ्या पत्नीनंच आपल्या प्रियकराच्या मदतीनं रचलेला हा एक थंड डोक्यानं केलेला 'मर्डर प्लॅन' असल्याचं निष्पन्न झालं. अग्रवाल कुटुंबात लग्नाची तयारी सुरू असताना, प्रेमातील अडसर दूर करण्यासाठी केतनची भावी पत्नी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी या दोघांनी मिळून केतन अग्रवालची



लोहगड किल्लयावरून दरीत ढकलून हत्या केल्याचं तपासाअंती स्पष्ट झालं. सियाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी केतन लोहगडावर गेला होता. यावेळी फोटोसाठी पोज देताना सियाच्या प्रियकरानं केतनला दरीत ढकललं. केतनची हत्या एक अपघात असल्याचा प्लॅन होता असं सिया आणि तिच्या प्रियकराला दाखवायचं होतं. पण एका सीसीटिव्हीत या दोघांच्या संशयास्पद हालचाली कैद झाल्यानं दोघांनी केतनची हत्या केल्याचं उजेडात आलं. सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांना अटक करण्यात आलीय.

केतन अग्रवाल आणि सिया गोयल यांचा फेब्रुवारी महिन्यात साखरपुडा झाला. नोव्हेंबरमध्ये हे दोघे बोहल्यावर चढणार होते. त्यासाठी जयपूरमध्ये १४ कोटींचा पॅलेस आणि दोन खासगी विमानं बुक करण्यात आलेली. मात्र त्याआधी काहीही करून केतनचा काटा काढण्याचं सियानं आणि चेतननं ठरवलं आणि लोहगडावरुन ढकलून त्याची हत्या केली. आता या प्रकरणानं संपूर्ण देशभरात संतापाची लाट उसळली.


## 1 BHK Flat किरायाने देणे आहे

प्रशस्त, सर्व सोयीने युक्त, सिलिंग, सेमी फर्निचर, सीसीटीव्ही कव्हरेज, पाण्याची २४ तास उपलब्धता. सुमित्रा पेट्रोल पंपाच्या अगदी जवळ, **1BHK** फ्लॅट किरायाने देणे आहे.

पत्ता- राम सेतू पुलाजवळ, रामेश्वर मंदिराच्या बाजूला, विजय नगर शिक्षक कॉलनी, जुना कौठा, नांदेड – ४३१६०३

**Contact Number**
**9403854442, 8208778403**

## टी.सी. हरवली

माझी गिरीष बालाजी बुरगुलवार या नावाची बारावी पासची टी.सी. मुखेड ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

**संपर्क पत्ता –**
**गिरीष बालाजी बुरगुलवार**
**रा. भावसार चौक, नांदेड**


# तालुकास्तरावर पत्रकारांसाठी घरे बांधण्यास जमीन मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**हिंगोली (प्रतिनिधी)** – हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली सह वसमत, सेनगाव, औंढा (नागनाथ) आणि कळमनुरी या पाच तालुक्यांतील पत्रकारांनी एकत्र येत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या संस्थेसाठी शासकीय किंवा गायरान जमीन उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी १ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले.



प्राप्त निवेदनात म्हटले आहे की, ग्रामीण व शहरी भागात अहोरात्र पत्रकारिता करणाऱ्या अनेक पत्रकार बांधवांकडे तालुक्याच्या ठिकाणी स्वतःचे हक्काचे निवासस्थान नाही. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून समाजाचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवणाऱ्या पत्रकारांना घरांची नितांत गरज आहे. त्यामुळे प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रेस फोटोग्राफर्स तसेच अधिकृत सोशल मीडिया पत्रकारांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याचे ठरवले आहे.

संस्था प्रत्यक्षात येण्यासाठी आणि नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून जमीन उपलब्धतेचे 'ना हरकत प्रमाणपत्र' किंवा सकारात्मक पत्र मिळणे आवश्यक आहे. निवेदनातून जिल्हाधिकाऱ्यांना तीन प्रमुख मागण्या करण्यात आल्या. हिंगोली, वसमत, सेनगाव, औंढा (ना.) आणि कळमनुरी या तालुक्यांच्या ठिकाणी पत्रकारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी योग्य शासकीय किंवा गायरान जमीन द्यावी. जमीन उपलब्धतेबाबत प्रशासकीय मंजुरीचे पत्र द्यावे जेणेकरून संस्था रीतसर अस्तित्वात येईल. तसेच अल्प व मध्यम उत्पन्न असणाऱ्या पत्रकारांना हक्काची घरे मिळावीत यासाठी सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी मागणी आहे.

लोकशाहीच्या या चौथ्या स्तंभाला आणि त्यांच्या कुटुंबाला हक्काचे छप्पर मिळवून देण्यासाठी तात्काळ तालुका महसूल प्रशासनाला निर्देशित करून नियम व अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून जमीन उपलब्ध करून देण्याबाबत पत्र द्यावे, अशी विनंती अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाच्या वतीने दिलेल्या निवेदनाच्या शेवटी करण्यात आली आहे.

या निवेदनावर वसमत, सेनगाव, औंढा (ना.) आणि कळमनुरी तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत. पत्रकारांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या सकारात्मक निर्णयाची प्रतीक्षा व्यक्त केली आहे.

# परराज्यातून येणाऱ्या वाळूवर 'झिरो रॉयल्टी'

**मुंबई (प्रतिनिधी)** – बांधकाम क्षेत्राला गती देण्यासाठी आणि सर्वसामान्यांना तसेच शासकीय गृहनिर्माण योजनांना वेळेत वाळू उपलब्ध करून देण्यासाठी नंदूरबार जिल्ह्यात परराज्यातून येणाऱ्या वाळूबाबत 'झिरो रॉयल्टी'चे धोरण चालू अधिवेशन संपण्यापूर्वीच जाहीर करण्यात येईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत केली. त्याचप्रमाणे अवैध वाहतूक रोखण्यासाठी कोकण आयुक्तांच्या नियंत्रणात 'वॉर रूम' स्थापन केली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी नंदुरबार जिल्ह्यातील वाळू टंचाई आणि गुजरातवरून येणाऱ्या वाळूबाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते.


## VEHICL FOR SALE

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

| Vech No. | Year | Model |
|---|---|---|
| MH-38-AD-3401 | 2023 | RENAULT-TRIBER |

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

All offer may of exclusive of TAX where applicable. The purchaser shall have to take all necessary steps for transferring the vehicle in his name with the RTO. Offer should reach us on or before 09/07/2026 Offer reach after the sold date the company reserve the right to reject any or all the offer without assigning any reason what so ever. The company does not undertake any responsibility for non-receipt/loss/delay of offer documents during transit. The offer should be sent to the following address.

SUNDARAM FINANCE LIMITED
IInd Floor, Parmar Complex, Bafna T-Point, Nanded 431601
8108157969, 8108151742

## टी.सी. हरवली

माझी शेख खाजा मस्तानशहा या नावाची दहावी पासची टी. सी. नांदेड ते रहाटी बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

**संपर्क पत्ता –**
**रहाटी बु. ता.जि. नांदेड**

## Change In Name

My old name is **SHAZIYA FIRDOSE MIRZA ANWAR BAIG** which now I am changing as New name **SHAZIYA FIRDOS AMJAD KHAN** hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.
Shaziya Firdos Amjad Khan
Sugra Manzil, Plot No. 12,Galli No.16, Millat Nagar Near Water Tank-Nanded, Tq & Dist. Nanded.
Pin Code:431604 Contact No. 9860008064

## टी.सी. हरवली

मी देगलूर ते हणेगाव या बसने प्रवास करीत असताना माझी अमोल काशीराम पवार या नावाची बारावी पासची टी. सी. हरवली आहे. कृपया सापडल्यास पुढील पत्यावर कळवावे.

**संपर्क पत्ता –**
**अमोल काशीराम पवार**
**सेवादास नगर तांडा, हणेगाव**
**ता. देगलूर जि. नांदेड**

## टी.सी. हरवली

माझी बळीराम केशवराव पवार या नावाची गव्हर्मेंट पॉलिटेक्निक कॉलेज नांदेड येथील डिप्लोमा मूळ प्रत ही नांदेड ते निवघा प्रवास दरम्यान हरवलेले आहे. तरी कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:**
**बळीराम केशवराव पवार**
**रा. नांदेड ता.नांदेड जि.नांदेड**
**मोबाईल:- ९८५२२५५७७७**

## टी.सी. हरवली

माझी श्रेया राजेश जाधव रा. खैरगाव ता.नायगाव जि.नांदेड या नावाची तीसरी (३), पासची टी. सी. नायगाव ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

**संपर्क पत्ता –**
**श्रेया राजेश जाधव खैरगाव**
**ता.नायगाव खै. जि. नांदेड**
**मो. १७५४३९२२२**

## घरातुन निघून गेला आहे



उमरी – माझे वडील नामे पिराजी बुधाजी चव्हाण राहणार तळेगाव ता. उमरी, हल्ली मुक्काम वाडी रोड उमरी. ता. उमरी, जि. नांदेड , वय ७६ वर्षे हे १३-७-२००८ पासून घरातून निघून गेले आहेत. आजवर आम्ही त्यांचा शोध घेतला. मात्र ते कुठेच सापडले नाहीत. स्वतःहून घरी परत येतील. म्हणून वाट पाहिली. आज पर्यंत ते परत घरी आले नाहीत. सावळा वर्ण असून धोती , कमीज शर्ट व डोक्याला साधा फेटा असा त्यांचा नेहमीचा पेहराव आहे. त्यांना मराठी व काही प्रमाणात हिंदी भाषा बोलता येते. ते निरक्षर असून त्यांना लिहिता वाचता येत नाही. सदरील वर्णनाची व्यक्ती कुणाला आढळल्यास कृपया खालील पत्त्यावर किंवा उमरी, जिल्हा नांदेड (महाराष्ट्र) येथील पोलीस स्टेशनला माहिती द्यावी.

**दत्ता पिराजी चव्हाण**
**मु. पो. वाडी रोड, उमरी. (रेल्वे स्टेशन)**
**ता. उमरी , जिल्हा नांदेड.**
**मो. नं. ९४२३६५७२११**

## Change In Name

My Old Name is **PATIL MANOHAR MAROTRAO** which now I am changing as New Name **PATIL MANOHAR MAROTIRAO** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - At.Po. Kasrali, Matha Galli, Kasrali, Tq. Biloli Dist. Nanded 431710**
**Mo.No. 9766075681**

## Change In Name

My Old Name is **SAEEDA NAGMA BEGUM MOHAMMAD ABDUL MAROOF** which now I am Changing as New Name **SAEEDA NAGMA BEGUM.** Hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.
Address:
9-7-292/5, Hyder Bagh, 2nd Floor, Naka, Nanded, Maharashtra – 431604.

## Change In Name

My Old Name is **MOHAMMAD ABDUL MAROOF MOHAMMAD ABDUL MUBEEN** which now I am Changing as New Name **MOHAMMAD ABDUL MAROOF.** Hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.
Address: 9-7-292/5, Hyder Bagh, 2nd Floor, Naka, Nanded, Maharashtra – 431604.

## पाहिजेत

**मोमीन एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित**

## इस्लाहुल अमल गर्ल्स हायस्कुल सय्यदान नांदेड

इस्लाहुल अमल गर्ल्स हायस्कुल सय्यदान नांदेडमध्ये बि. एस्सी., बि. एड. (विज्ञान विषय) शिक्षण सेवकाची एक पद अनुदान तत्वावर भरणे आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी (बि. एस्सी., बि. एड.) मुळ शैक्षणिक प्रमाणपत्र व साक्षांकीत प्रतीसह स्वतः खर्चाने दिनांक ०५-०७-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता शाळेच्या कार्यालयात उपस्थित रहावे.

**स्वाक्षरीत/-**
**सेक्रेटरी**
**इस्लाहुल अमल गर्ल्स**
**हायस्कुल सय्यदान नांदेड**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०८/२०२६
(CNR No.MHND10007612026)

अर्जदार - १ सविता नरहरी संगेवार वय - ८५ वर्षे, धंदा-घरकाम, २ पुरुषोत्तम नरहरी संगेवार वय - ६६ वर्षे धंदा-पेन्शनर, ३ उमाकांत पि. नरहरी संगेवार वय - ६२ वर्षे धंदा-पेन्शनर, अर्जदार क्र. १ ते ३ रा. कंधार ता. कंधार जि. नांदेड ४. अनुसया किशोर नोमुलवार रा. नांदेड जि. नांदेड वय - ५४ वर्षे, ५ रेणुका सुर्यकुमार यन्नावार, रा. सिडको नांदेड ता. जि नांदेड वय - ५२ वर्षे धंदा - घरकाम, ६. ओमप्रकाश नरहरी संगेवार वय-५५ वर्षे, धंदा - व्यापार, ७. प्रशांत नरहरी संगेवार अर्जदार क्र. ६ ते ७ रा. कंधार ता. कंधार, जि. नांदेड, वय - ५३ वर्षे, धंदा - नौकरी.

विरुध्द

गैरअर्जदार-निरंक

प्रकरण- अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ७ यांचे वडील नामे नरहरी मारोती संगेवार हे होते. ते दिनांक ०९/०३/२०२६ रोजी कंधार ता. कंधार येथे मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, नरहरी मारोती संगेवार यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत नरहरी मारोती संगेवार यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत नरहरी मारोती संगेवार यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख -२४/०७/२०२६. आज रोजी दि. २३/०६/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, कंधार

## जाहीर प्रगटन

मा. आर. पी. शिंदे सह दिवाणी न्यायाधीश
क. स्तर नांदेड यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज ६२४/२०२६
विलास व ईतर वि. निरंक ने,ता, ३०/०७/२०२६.

अर्जदार:-१ विलास पि. रंगराव देशमुख, वय ५६ वर्षे, व्यवसाय -व्यापार, २. सुनिल पि. रंगराव देशमुख, वय ५२ वर्षे, व्यवसाय - व्यापार दोघे रा. सिध्दार्थ नगर, सांगवी बु., नांदेड ता. जि. नांदेड ३. सौ. कल्पना भ्र. प्रताप कदम, वय ५० वर्षे, व्यवसाय -घरकाम रा. बारड, शेवाळा ता. हदगाव जि. नांदेड, ४. चंद्रकांत पि. रंगराव देशमुख, वय ४८ वर्षे, व्यवसाय-व्यापार रा. सिध्दार्थ नगर, सांगवी बु., नांदेड, ता. जि. नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार: शाखा व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा श्रीनगर कॉलनी, नांदेड

दावा:- भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत रंगराव किशनराव देशमुख यांचा मृत्यू दिनांक १०/०७/२०१७ व मयत गोदावरीबाई भ्र. रंगराव देशमुख यांचा मृत्यू दिनांक ०६/०६/२०१५ रोजी नांदेड, ता.जि. नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १, २ व ४ ही मयतांची मुले असून, अर्जदार क्र. ३ ही मयतांची मुलगी आहे. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ ते ४ हे मयताच्या वारसदार आहेत असे नमूद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत रंगराव किशनराव देशमुख यांनी त्यांच्या हयातीत गैरअर्जदार यांच्याकडे खाते काढले होते. सदरील खाते क्र. ५२०७२५८९१४२ असून सदर खात्यावर रुपये ८५,०००/- शिल्लक आहेत. तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

क. लिपिक — सहा.अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय,क, स्तर, नांदेड

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २१३/२०२६
(CNR No.MHND10007672026)

१. सविता नरहरी संगेवार, वय - ८५ वर्षे धंदा - घरकाम

२. पुरुषोत्तम नरहरी संगेवार वय - ६६ वर्षे, धंदा - पेन्शनर, ३ उमाकांत पि. नरहरी संगेवार वय-६२ वर्षे, धंदा - पेन्शनर, ४. अनुसया किशोर नोमुलवार वय - ५४ वर्षे धंदा - घरकाम रा. नांदेड, ५ रेणुका सुर्यकुमार यन्नावार वय - ५२ वर्षे-धंदा घरकाम, ६. ओमप्रकाश नरहरी संगेवार वय - ५५ वर्षे, धंदा - व्यापार, ७. प्रशांत नरहरी संगेवार वय - ५३ वर्षे, धंदा - नौकरी, सर्व रा. कंधार ता. कंधार जि. नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार-एस. बी. आय शाखा कंधार जि. नांदेड

प्रकरण -भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ नुसार वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेबाबत.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ७ यांची वडिल नामे नरहरी मारोती संगेवार हे होते. ते दिनांक ०९/०३/२०२६ रोजी कंधार ता. कंधार येथे मयत झाले आहेत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत नरहरी मारोती संगेवार यांचे वारस असल्याबाबत गैरअर्जदार एस. बी. आय. शाखा कंधार जि. नांदेड यांच्या बचत खाते क्र. ५२१७५२४९१११ मध्ये रक्कम रुपये १,४०,०२३.९३/- (एक लाख चाळीस हजार तेवीस रुपये त्र्यान्नव पैसे) इतकी जमा आहे सदरील खात्यांमध्ये जमा असलेली रक्कम अर्जदार यांना मिळणेसाठी वारसा प्रम णपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत नरहरी मारोती संगेवार यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र (डीललर्शीळेप उर्शीळषळलरींश) देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख- ३०/०७/२०२६.

आज रोजी दि.२४/०७/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, कंधार

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# महायुती सरकार शेतकऱ्यांचे हित जपते- खा. श्रीकांत शिंदे

## माहूर तालुक्यात अंजनखेडा येथे दाखविले काळे झेंडे



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यामध्ये महाविकास आघाडीच्या काळात शेतकऱ्यांच्या हिताचा कुठलाच निर्णय झाला नसल्याने ते नेहमी कांगावा करतात, परंतु शेतकऱ्यांचे हित सतत आपल्या डोळ्यासमोर ठेवून महायुती सरकार काम करत असून, शेतकऱ्यांना ते कधीही वाऱ्यावर सोडणार नाहीत, असा विश्वास शिवसेना नेते खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केला.

माहूर तालुक्यातील सारखणी येथे हदगाव-हिमायतनगरचे आमदार बाबुराव पाटील कोहळीकर यांनी स्थानिक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आरोग्य व सर्व रोगनिदान शिबीर तसेच रुग्णवाहिका लोकार्पण सोहळ्यासाठी खा. डॉ. श्रीकांत शिंदे बुधवार, दि. १ जुलै रोजी नांदेड दौऱ्यावर आले असता श्री गुरुगोविंदसिंग विमानतळावर पत्रकारांशी ते बोलत होते. नांदेड जिल्ह्यात शिवसेना पक्षवाढीसंदर्भात वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

श्रीकांत शिंदे बुधवारी सकाळी नांदेड विमानतळावर आल्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, महायुतीचे सरकार हे नेहमी शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून काम करत आहे. महायुती सरकारनेच शेतकऱ्यांना एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून दुष्काळ, पूरग्रस्त आदी संकटात आर्थिक मदत दिली. कृषीपंप, कर्जमाफी यासाठीही महायुती सरकार आघाडीवर आहे. विरोधकांकडे आता कुठलाही विषय राहिला नाही. ते सतत या ना त्या कारणावरून कांगावा करत आहेत. त्यांच्या बोलण्याकडे आम्ही फारसे लक्ष देत नाही. यापुढेही भविष्यात शेतकऱ्यांच्या हिताची कामे आमचे सरकार करेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

> शिवसेनेचे नेते तथा खासदार श्रीकांत शिंदे हे माहूर दौऱ्यावर आल्यानंतर त्यांच्या ताफ्याला अंजनखेडा तालुका माहूर येथे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी काळे झेंडे दाखवून बंडखोर खासदारांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी केली. यावेळी उपस्थित पोलिसांनी काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. एवढेच नाही तर या भागाचे जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांना सकाळपासूनच पोलिसांनी नजरकैदेत ठेवले होते.

# रेल्वेस्थानकावर सापडलेले अर्भक बालकल्याण समितीच्या स्वाधीन

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील हुजूर साहेब रेल्वे स्थानकाच्या फलाट क्र. १ वर एक अज्ञात माता दोन महिन्यांच्या स्त्री जातीच्या अर्भकास टाकून निघून गेली. सदरचे जिवंत बालक लोहमार्ग पोलिसांनी ताब्यात घेऊन बालकल्याण समितीमार्फत शासकीय शिशुगृह लोहा येथे दाखल केले आहे. सदर निर्दयी मातेचा शोध पोलीस घेत आहेत.

येथील रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक १ वरील एक्सलेटरजवळ ३० जून रोजी एक दोन महिन्याचे स्त्री जातीचे बालक रडत असल्याचे रेल्वे प्रशासनाला एका प्रवाशाने सांगितले. यावेळी रेल्वे स्थानक व्यवस्थापक आशितोष प्रभाकर यांनी ही माहिती लोहमार्ग पोलीस निरीक्षक प्रकाश वाघमारे यांना सांगितली. वाघमारे यांनी तातडीने आपले सहकारी पोलीस अंमलदार यांना त्या ठिकाणी पाठवले. जिवंत असलेल्या दोन महिन्यांच्या स्त्री जातीच्या बालकास पोलिसांनी ताब्यात घेऊन रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर बाल कल्याण समितीला माहिती दिली. बालकल्याण समितीच्या कर्मचाऱ्यांनी येऊन सदरील बालक लोहा येथील शासकीय शिशुगृहात दाखल केले आहे. या निर्दयी मातेचा शोध लोहमार्ग पोलीस घेत आहेत. घटनास्थळाला पोलीस निरीक्षक प्रकाश वाघमारे, सहायक पोलीस निरीक्षक रेखा शहारे यांनी भेट देऊन रेल्वेस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून सदर महिलेचा शोध घेण्यात येत आहे.

## धर्माबाद शहरातील महसूल विभागाच्या संचिकांना फुटले पाय

# २० फेरफारच्या संचिका गायब

## आरडीसी किरण अंबेकर घालणार लक्ष

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील महसूल विभागाचा कारभार पारदर्शक पद्धतीने व्हावा, शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीबद्दलची माहिती वेळेच्या वेळी त्या त्या विभागाच्या पोर्टलवर उपलब्ध करावी, शेतकऱ्यांना शासकीय कार्यालयात खेटे मारण्यास भाग पडू नये यासाठी ऑनलाईन पद्धतीचा कारभार करण्यावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जोर दिला. इकडे मात्र धर्माबाद शहरातील बाळापूर परिसरात फेरफार झालेल्या २० संचिकाच गायब झाल्याने महसूल विभागात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात स्वतः निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर वरिष्ठांच्या आदेशावरून लक्ष घालणार असल्याने हा मोठा भूखंड घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद शहरातील बाळापूर परिसरात शेत (सर्वे नंबर ५९६/१/ए) अंतर्गत काही वर्षांपूर्वी फेरफार करण्यात आले. सदर फेरफार संदर्भात माहितीच्या अधिकारांतर्गत शेख एजास यांनी बाळापूर सज्जाचे विद्यमान तलाठी यांच्याकडे माहिती मागितली. त्यानंतर मूळ अभिलेखात फेरफार झालेल्या संचिका आढळून आल्या नाहीत. त्या उपलब्ध झाल्यानंतर आपणांस माहिती देतो असे सांगून तत्कालीन तलाठी यांनी मी पदभार घेताना आपण विचारलेल्या माहितीच्या संचिका माझ्या ताब्यात दिल्या नसल्याचेही स्पष्ट केले.

या फेरफार संदर्भात करोडो रुपयांचा घोटाळा झाल्याची माहिती समोर येत असून, या प्रकरणात स्वतः निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर हे लक्ष घालणार आहेत. विशेष म्हणजे ही बाब तहसीलदार धर्माबाद यांना का समजली नाही, असाही प्रश्न यानिमिताने उपस्थित होत आहे. या प्रकरणाच्या मुळाशी चौकशी केल्यास नक्कीच मोठा भूखंड घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



**नांदेड –** माजी मंत्री डी. पी. सावंत व संतोष मुळे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपक रावत, बलवंतसिंह गाडीवाले, विरेंद्रसिंघ गाडीवाले, सुखदेव जाधव, दत्ता पाटील कोकाटे, बालाजी शिंदे, माधवराव शिंदे, गंगाधरराव कदम, दीपक पाटील, गोविंदराव आढाव, नागोराव आढाव, अतुल वाघ, दिलीप डांगे, निखील चौधरी, शिवाजीराव पावडे, बी. जी. गाडीवाले, पंढरीनाथ बोकारे, बबन वाघमारे, चांदू बागल, रंगनाथ चंदेल, त्रिंबक शिंदे, नंदू जोगदंड आदी दिसत आहेत. **(छाया : करणसिंह बैस, नांदेड)**

# गुटखा व अंमली पदार्थ विरोधी कारवाईत १ कोटी २७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

## नांदेड पोलीस परिक्षेत्रातील मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)–** परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १ ते ३० जून २०२६ या कालावधीत विशेष गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबविण्यात आली. या एका महिन्याच्या कालावधीत परिक्षेत्रातील तब्बल १० हजार ६०४ पानटपऱ्यांची झाडाझडती घेण्यात आली. विविध कलमांखाली एकूण ८० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या धडक कारवाईत पोलिसांनी १११ आरोपींविरुद्ध गुन्हे नोंदवून एकूण १ कोटी २७ लाख ४९ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या मोहिमेदरम्यान गुटखा व्यावसायिकांवर कडक कायदेशीर बडगा उगारण्यात आला. भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३ अंतर्गत परिक्षेत्रात एकूण ६७ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये सर्वाधिक २३ गुन्हे परभणी जिल्ह्यात, तर नांदेड जिल्ह्यात २० आणि हिंगोली व लातूर जिल्ह्यात प्रत्येकी १२ गुन्हे दाखल झाले आहेत. या गुटखा विरोधी कारवायांमध्ये ९२ आरोपींना निष्पन्न करून १ कोटी १६ लाख ३६ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

गुटख्यासोबतच अंमली पदार्थांची विक्री, वाहतूक आणि साठवणूक करणाऱ्यांवरही एनडीपीएस कायद्यान्वये कडक कारवाई करण्यात आली. परिक्षेत्रात अंमली पदार्थ विरोधी मोहिमेत एकूण १३ गुन्हे दाखल झाले असून, १९ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यात ७, परभणी ३ आणि लातूर जिल्ह्यात ३ गुन्हे नोंदवण्यात आले. या कारवाई दरम्यान पोलिसांनी ११ लाख १३ हजार ३०० रुपयांचा अंमली पदार्थ (गांजा) जप्त केला आहे.

जून महिन्यातील या यशस्वी मोहिमेनंतर, आता १ जुलै २०२६ पासून संपूर्ण नांदेड परिक्षेत्रात 'अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम' राबविण्यात येणार आहे. या नव्या मोहिमेअंतर्गत गुटखा, अंमली पदार्थांसह मटका, जुगार, बेकायदेशीर दारू विक्री, अवैध वाळू उपसा व वाहतूक, वेश्या व्यवसाय आणि अवैध प्रवासी



वाहतूक अशा सर्वच बेकायदेशीर कृत्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस उपमहानिरीक्षकांनी सर्व पोलीस अधिकाऱ्यांना दिले आहेत.

नागरिकांना आपल्या परिसरातील अवैध व्यवसायांची थेट माहिती पोलिसांना देता यावी, यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' हेल्पलाईन सुरू केली आहे.

# विद्यापीठात 'विकास अध्ययन' पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाड्याच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांवर काम करू इच्छिणाऱ्या आणि या क्षेत्रात कुशल व्यावसायिक बनू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या 'डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासना'तर्फे २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी 'विकास अध्ययन पदव्युत्तर पदविका' (Post-Graduate Diploma in Development Studies) हा नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. विकास अध्ययन हे अभ्यासाचे नवे क्षेत्र असून मराठवाड्याच्या समन्यायी विकासासाठी तसेच विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधींचा लाभ मिळविण्यासाठी या अभ्यासक्रमाचा लाभ मिळेल. प्रादेशिक भाषेत उपलब्ध असणारा हा कदाचित भारतातील पहिलाच वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रम ठरत आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी दिली.

ग्रामीण विकास, सार्वजनिक धोरण आणि प्रशासकीय क्षेत्रातील करिअरच्या दृष्टीने हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम १ वर्षाचा असून यात दोन सत्रांचा समावेश आहे. हे शिक्षण 'ब्लेंडेड मोड'द्वारे दिले जाणार आहे. यामध्ये ऑनलाईन लेक्चर्स आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय कार्याचा समावेश आहे. ही पद्धत नोकरी करणारे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत सोयीस्कर आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

अभ्यासक्रम मराठी आणि इंग्रजी (द्विभाषिक) माध्यमातून शिकवला जाईल. यामध्ये एकूण २० प्रवेशाच्या जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. कोणताही पदवीधर विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतो आणि यासाठी टी. सी.ची आवश्यकता नाही, असे अध्यासनाचे समन्वयक डॉ. दिलीप चव्हाण यांनी कळविले आहे.

# 'एसआयआर' अंतर्गत उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या भेटी

**नांदेड (प्रतिनिधी) –** मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम एसआयआर अंतर्गत नांदेडचे उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ व सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा नांदेडचे तहसीलदार संजय वारकड यांनी सिडको भागातील रामनगर येथील विविध ठिकाणी भेटी देऊन नाव नोंदविण्यासाठी आवश्यक फॉर्म वाटपाचा शुभारंभ केला व या कामाचा आढावा घेतला. यावेळी सहायक मतदार नोंदणी अधिकारी सूरज स्वामी यांचेसह नियुक्त कर्मचारी व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा. भारत निवडणूक आयोगा-कडील मतदार यादीचे विशेष पुनरिक्षण कार्यक्रम एसआयआर राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने ८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ अंतर्गत बीएलओ यांच्याकडून मतदारांना मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी आवश्यक फार्मचे वाटप करून व त्यांची माहिती भरून घेण्याचे काम ३० जून २०२६ पासून सुरू झाले आहे. त्या अनुषंगाने कामकाजाचा



आढावा घेण्यासाठी मतदार नोंदणी अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ व तहसीलदार संजय वारकड यांनी सिडको भागातील रामनगर परिसरातील यादी भाग क्रमांक २०८ मधील मतदारांना भेटी दिल्या व कामासंबंधी समाधान व्यक्त केले. यावेळी सहायक मतदार नोंदणी अधिकारी सुरज स्वामी, बीएलओ पर्यवेक्षक कालिदास जाधव, एस. एम. देवरे, संतोष जाधव, दिलीप कोनापुरे, गोविंद क्षीरसागर आदी उपस्थित होते. यावेळी अश्विनी अनिल पद्मावार, अनिल रामदास पद्मावार, हनुमंत शंकरराव भोसकर, गिरीश हनुमंतराव भोसकर यांना मान्यवरांच्या उपस्थितीत एसआयआर संबंधी इम्युनरेशन फॉर्म वाटप करून या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

# कृषी दिनानिमित्त मनपाच्या वतीने वृक्षारोपण



**नांदेड (प्रतिनिधी)–** हरितक्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिनाचे औचित्य साधून महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय क्र. १ (तरोडा-सांगवी) व वृक्षमित्र फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिजाऊ नगरी, सांगवी येथे मोठ्या उत्साहात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. यावेळी महापौर कविता संतोष मुळे आणि पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रत्येक घराच्या परिसरात किमान एक झाड आणि शेताच्या बांधावर वृक्षवल्ली लावून समृद्धी फुलवा, हा स्व. वसंतराव नाईक यांचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पर्यावरण जनजागृती व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी महापौर कविता मुळे यांनी सांगितले की, सदरील वृक्षलागवड १०० दिवसांच्या विशेष अभियानाचा भाग असून, पावसाअभावी हा उपक्रम पुढे ढकलण्यात आला होता. आता तो पूर्ण करण्यात येत आहे. लावण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षाचे किमान एक वर्ष संगोपन करण्याची जबाबदारी सर्वांनी स्वीकारावी. वृक्षसंवर्धनामुळे भविष्यातील ग्लोबल वॉर्मिंगचे दुष्परिणाम कमी करण्यास निश्चितच मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे पालिका आयुक्त डॉ. महेश डोईफोडे यांनी 'हरित नांदेड'चा संकल्प व्यक्त करत महानगरपालिका क्षेत्रात किमान २५०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्याच्या सूचना दिल्या. तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने महानगरपालिकेच्या मोकळ्या जागा, उद्याने व रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, माजी उपमहापौर तथा नगरसेवक सतीश देशमुख, उद्यान अधीक्षक तथा क्षेत्रिय अधिकारी डॉ. फरतुल्ला मिर्झा बेग, क्षेत्रिय अधिकारी निलावती डावरे, रमेश चवरे, रावण सोनसळे, राजेश जाधव, संतोष मुळे, गजानन देशमुख, सरस्वती राऊत, वृक्ष मित्र फाऊंडेशनचे अध्यक्ष संतोष मुगटकर, संतोष जिंतूरकर, श्याम कानोटे, राजू जोरवर, रमेश ढोले, शिवकांता स्वामी, सुरेखा टाकळीकर तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहेबराव ढगे यांनी केले तर आभार विठ्ठल तिडके यांनी मानले.

# अवैध देशी दारूसह १२ हजारांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध दारू विक्री, हातभट्टी व वाहतुकी विरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने बिलोली उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी शाम पानेगावकर यांच्या पथकाने कारवाई करून तब्बल १२ हजार दोनशे रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अवैध देशी दारु आपल्या दुचाकीवर घेऊन एक युवक घुंगराळा-बळेगाव मार्गे विक्रीसाठी जात असल्याची माहिती श्री पानेगावकर यांना मिळाली. यावरून त्यांनी आपल्या पथकाला कारवाई करण्याची सूचना दिली.

३० जून रोजी पोलीस पथक कुंटूर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत होते. वरिष्ठांच्या सूचनेवरून घुंगराळा- बळेगाव मार्गे अवैधरित्या देशी दारू विक्रीसाठी घेऊन जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून संबंधित युवकाचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव तिरुपती बाबाराव बेलकर (वय १९ वर्षे, रा. बळेगाव, ता. नायगाव, जि. नांदेड) असे सांगितले. पंचांसमक्ष आरोपीच्या ताब्यातील (MH-26 CR-5372) क्रमांकाच्या होंडा यूनिकॉर्न मोटारसायकलची झडती घेतली असता, 'भिंगरी संत्रा' लेबल असलेल्या १८० मि.ली. क्षमतेच्या २४० काचेच्या देशी दारूच्या बाटल्या अंदाजे १९ हजार २०० रुपये किंमत व होंडा युनिकॉर्न मोटारसायकल असा एकूण ९२ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# नांदेड रेल्वे परिसरात ५१ हजार वृक्ष लागवडीचा संकल्प

**नांदेड (प्रतिनिधी)–** हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान तसेच वन महोत्सव २०२६ आणि 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत, महाराष्ट्राचे हरित क्रांतीचे जनक व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त व कृषी दिनाचे औचित्य साधून दि. १ जुलै रोजी सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड व मंडळ रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने वनमहोत्सव २०२६ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

प्रदीप कामले, विभागीय रेल्वे व्यवस्थापक नांदेड यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. हा कार्यक्रम संदीप चव्हाण, विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण), नांदेड व




नितेश निघडे, सहायक वनसंरक्षक नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

यावेळी कल्याण राजू, अप्पर विभागीय रेल्वे व्यवस्थापक, डॉ. एम. के. श्रीनिवासा, मुख्य चिकित्सा अधिकारी, तसेच रेल्वे विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी गिरीश लख्खेकर यांनीही वृक्षारोपण करून वन महोत्सवाची सुरुवात केली. यंदाच्या वन महोत्सवानिमित्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयाच्या परिसरात सुमारे ५१ हजार वृक्षांची लागवड करण्यात येणार असून, ३५ ते ४० विविध प्रजातींच्या वृक्षांची घनवन पद्धतीने लागवड केली जाणार असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी गिरीश लख्खेकर यांनी दिली.

या उपक्रमामुळे रेल्वे परिसर अधिक हिरवागार होण्यास, पर्यावरण संवर्धनाला चालना मिळण्यास तसेच जैवविविधतेच्या संवर्धनास महत्त्वपूर्ण हातभार लागणार आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com